

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




## ई मासिक विद्यासंवाद

सप्टेंबर २०२४ | आवृत्ती–१५



## मा. राज्यपाल श्री. सी. पी. राधाकृष्णन यांचे स्वागत

विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

सप्टेंबर २०२४ | आवृत्ती–१५

मार्गदर्शक
**डॉ. प्रशान्त बोकारे**
**प्रभारी कुलगुरु**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
**जनसंपर्क अधिकारी**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
**प्रकाशन अधिकारी**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. सी. पी. राधाकृष्णन**



मा. प्रभारी कुलगुरु
**डॉ. प्रशान्त बोकारे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**












# आदर्श शिक्षक हा विद्यार्थीच असतो -डॉ. प्रेम लाल पटेल

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

विद्यार्थ्यांना नवनवीन संकल्पनेतून शिक्षण देण्याचे कार्य शिक्षकांना करावे लागणार आहे. त्यामुळे आदर्श शिक्षक हा विद्यार्थीच असतो, असे प्रतिपादन विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान नागपूरचे संचालक डॉ. प्रेम लाल पटेल यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शिक्षक दिन समारंभ कॅम्पस चौक ते अंबाझरी टी पॉइंट मार्गावरील गुरुनानक भवन येथे गुरुवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी पार पडला. या कार्यक्रमात आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. पटेल प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान नागपूरचे संचालक डॉ. प्रेम लाल पटेल, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल यांची उपस्थिती होती. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षकांच्या सन्मानार्थ शिक्षक दिन साजरा केला जात असल्याचे डॉ. पटेल यांनी पुढे बोलताना सांगितले. शिक्षकी पेशा किती महत्त्वाचा आहे, याचे उदाहरण देताना देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन साजरा केला जातो. विद्यमान राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु देखील शिक्षक आहेत तर राष्ट्रपती पद भूषविल्यानंतर भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी शिक्षक म्हणून कार्य केल्याचे डॉ. पटेल यांनी सांगितले. मुलाची प्रगती झाल्याने जसा पालकांना अभिमान वाटतो तसाच अभिमान विद्यार्थ्याने उच्च शिखर गाठल्याने त्यांच्या शिक्षकांना वाटतो. नवनवीन संकल्पनेतून शिक्षण देण्याचे कार्य करताना विद्यार्थ्यांनी अनुकरण करावे असे कार्य शिक्षकांकडून अपेक्षित आहे. आपल्या उच्चतम क्षमतेतून विद्यार्थी घडविण्याचे आवाहन डॉ. पटेल यांनी यावेळी शिक्षकांना केले. विद्यार्थ्यांची क्षमता ओळखून त्यांना उच्चतम क्षमतेकडे नेण्याचे कार्य शिक्षकांनी केले पाहिजे. पीएचडी संशोधक ज्याप्रमाणे स्वतंत्र संशोधक असतात. त्याचप्रमाणे शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना घडविले पाहिजे. समस्यांची सोडवणूक करून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करावे, असे डॉ. पटेल म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी देशाच्या विकासात शिक्षकांची मोठी भूमिका असल्याचे सांगितले. शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ असून देशाला प्रगतीच्या दिशेने नेणारे विद्यार्थी म्हणजेच नागरीक घडविण्याचे कार्य शिक्षकांनीच केले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील जीवती येथील मुलगी जर्मनीत नोकरीसाठी जात आहे, याचे श्रेय तेथील विपरीत परिस्थितीत शिक्षण देण्याचे कार्य करणाऱ्या शिक्षकांना जातात असे डॉ. बोकारे म्हणाले. जगातील प्रत्येक देशात, प्रत्येक भागात भारतीय असून ते चांगले कार्य करीत आहे. ही प्रगती केवळ शिक्षकांमुळेच झाली आहे. शिक्षकांमुळेच देश गौरवास प्राप्त होत आहे. शिक्षक कधीच अप्रासंगीक राहू शकत नाही. त्यामुळे शिक्षकांनी स्वतःला प्रासंगीक ठेवण्यासाठी बदलावे लागेल, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. शिक्षक हा जीवनात आशा, शांती, समृद्धी निर्माण करीत असल्याचे सांगितले. मनुष्याला योग्य दिशेने वाटचाल करण्याकरिता शिक्षक अर्थात गुरुच प्रेरित करीत असतो, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले.

## पुरस्कारांचे वितरण













प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते डॉ. आर कृष्णकुमार सुवर्णपदक पुरस्कार एस.बी. सीटी महाविद्यालय उमरेड रोड नागपूर येथील प्राचार्य डॉ. सुजित गजाननराव मेत्रे, उत्कृष्ट प्राचार्य (शहरी विभाग) पुरस्कार जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग हिंगणा रोडचे प्राचार्य डॉ. सचिन पी. उंटवाले, उत्कृष्ट प्राचार्य (ग्रामीण विभाग) सूर्योदय कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी विहीरगाव उमरेड रोड नागपूरचे प्राचार्य डॉ. विठ्ठल गुलाबराव अरजपुरे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर एन. करडे, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतून मातृ सेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क नागपूर येथील डॉ. प्रिन्स अजयकुमार तेजराम आगाशे (ग्रंथपाल), उत्कृष्ट संशोधक पुरस्कार (विद्यापीठ शैक्षणिक विभागातून) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. विना एस. बेलगमवार, उत्कृष्ट संशोधक पुरस्कार (विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातून) सेंट विन्सेंट पलोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी गावसी मानापूर वर्धा रोड नागपूर येथील डॉ. मिनहाज अहमद ए. रहमान, उत्कृष्ट लेखक पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहीतीशास्त्र विभागातील डॉ. शालिनी आर. लिहितकर तर उत्कृष्ट समाजकार्य पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या व्यवसाय प्रबंधन विभागातील डॉ. राहुल श्याम खराबे यांना वितरित करण्यात आला.



















## वार्षिकांक स्पर्धेतील पुरस्कारांचे वितरण

विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेतील १० हजार रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर, ७ हजार रुपयांचा द्वितीय क्रमांक हिस्लॉप कॉलेज नागपूर, ५ हजार रुपयांचा तृतीय क्रमांक गोविंदराम सेकसरीया वाणिज्य महाविद्यालय वर्धा तर जिल्हा निहाय ३ हजार रुपये प्रत्येकी उत्तेजनार्थ पुरस्कार नागपूर ग्रामीण मधून सेठ केसरीमल पोरवाल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कामठी, भंडारा जिल्ह्यातून यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य विज्ञान महाविद्यालय लाखांदूर, गोंदिया जिल्ह्यातून जगत कला वाणिज्य आणि इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव, जळगाव जिल्ह्यातून श्री संत गाडगेबाबा हिंदी महाविद्यालय भुसावळ यांना वितरित करण्यात आला.



















## विद्यापीठात दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना आदरांजली

### समाज मनमिळावू व कर्तृत्ववान व्यक्तीला मुकला - प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा पार पडली. समाज एका कर्तुत्ववान व मनमिळावू व्यक्तीला मुकला असल्याच्या शोकसंवेदना प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी यावेळी व्यक्त केल्या.





यावेळी प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. दिवंगत डॉ. सुभाष चौधरी यांच्या सोबत केलेल्या कार्याच्या आठवणीला उजाळा देताना डॉ. प्रशांत बोकारे यांनी आम्ही दोघेही एकाच वेळी ८ ऑगस्ट १९८७ रोजी एकाच महाविद्यालयात रुजू झाल्याचे सांगितले. तब्बल २५ वर्ष सोबत कार्य केल्याने त्यांचा अंर्तबाह्य प्रवास समजून येतो, असे ते म्हणाले. काम करण्याची विलक्षण निष्ठा त्यांच्यामध्ये होती. डॉ. चौधरी यांच्यासारखे दृढनिश्चयी कुलगुरू असल्यामुळेच विद्यापीठाने दुसऱ्यांदा इंडियन सायन्स काँग्रेसचे शिवधनुष्य पेलले असल्याचे ते म्हणाले. या आयोजनाने विद्यापीठच नव्हे तर नागपूर शहराचे देखील नाव मोठे झाले. अशा प्रकारची माणसे वारंवार होत नाही. त्यांचे जाणे मनाला चटका लावणारे असल्याचे सांगत त्यांनी चौधरी कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या.

प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी शोकसंवेदना व्यक्त करताना त्यांच्यासोबत केलेल्या कार्याला उजाळा दिला. शैक्षणिक बाबींसह विद्यापीठाच्या विकासाची त्यांची मोठी दूरदृष्टी होती. पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना स्वायत्तता देण्याबाबत सोबतच विविध धाडसी निर्णयांबबत त्यांनी माहिती दिली. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, माजी संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल साबळे, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, भूगर्भशास्त्र विभाग प्रमुख डॉ. किर्तीकुमार रणदिवे, आयआयएल प्रभारी संचालक डॉ. निशिकांत राऊत, पदव्युत्तर शैक्षणिक विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी शोक प्रस्ताव सादर केला. दोन मिनिटे मौन धारण करून सामुहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे व प्रशासकीय कामकाज संस्थगीत करण्यात आले.

## कुलगुरू म्हणून अविस्मरणीय कार्य

दिवंगत डॉ. सुभाष चौधरी यांनी ८ ऑगस्ट २०२० रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून सूत्रे सांभाळली होती. विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना स्वायत्तता प्रदान करून एक नवीन प्रयोग त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात केला. त्यांच्याच नेतृत्वात महाराष्ट्रात सर्वप्रथम नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यापीठाने लागू केले. त्यांच्या कार्यकाळात ४ ऑगस्ट २०२२ ते ४ ऑगस्ट २०२४ दरम्यान विद्यापीठाचा शताब्दी महोत्सव समारोह साजरा करण्यात आला. शताब्दी महोत्सव निमित्याने इंडियन सायन्स काँग्रेसचे दुसऱ्यांदा आयोजन करण्याची संधी विद्यापीठाला मिळाली. इंडियन फार्मास्युटिकल सायन्सचे आयोजन देखील याच दरम्यान करण्यात आले. शताब्दी महोत्सव निमित्ताने महाराष्ट्र शासनाने १०० कोटी रुपयांचा निधी देखील विद्यापीठाला उपलब्ध करून दिला. या शंभर कोटी रुपयांच्या निधीतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टीयुटीलिटी मल्टीस्टोरी स्पोर्ट कॉम्प्लेक्स, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क सह अन्य नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यापीठात त्यांच्याच नेतृत्वात आरंभ झाले. खेळाडूंना उत्तम दर्जाच्या सुविधा मिळाव्या म्हणून आंतरराष्ट्रीय दर्जाची सिंथेटिक ट्रॅकची त्यांच्या कार्यकाळात निर्मिती झाली. शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने पश्चिम क्षेत्रीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव, महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबिर तसेच महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रेरणा नेतृत्व गुण विकास शिबिराचे आयोजन करण्याची विद्यापीठाला संधी मिळाली. वंचित तसेच आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळावी म्हणून केंद्र सरकारच्या खेल मंत्रालय अंतर्गत खेलो इंडियाचे केंद्र विद्यापीठात सुरू करण्यास त्यांचा फार मोठा वाटा राहिला आहे. एवढेच नव्हे तर राज्य, राष्ट्रीय स्तरावर नाव गाजविलेल्या आर्थिक दुर्बल घटकातील खेळाडूंना आर्थिक स्वरूपात दरमहा मदत करण्याचा निर्णय देखील त्यांच्याच पुढाकाराने घेण्यात आला. विद्यापीठाला समाज विकासाचे माध्यम मानत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दिलेल्या ग्राम विकासाच्या संदेशाचे पालन करीत दिवंगत डॉ. सुभाष चौधरी यांनी 'रिचिंग टू अनरिच्ड' अभियान राबविण्यास सुरुवात केली. विद्यापीठ परिक्षेत्रातील नागपूर ग्रामीण, भंडारा, गोंदिया जिल्ह्यातील विविध भागात या अभियानाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार स्वयंरोजगार कसा प्राप्त करून देता येईल या दिशेने त्यांनी कार्यास सुरुवात केली होती.







## तरुणाईला योग्य दिशा देण्याचे रासेयोचे कार्य
## श्री मुरलीधर बेलखोडे यांचे प्रतिपादन
### राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

राष्ट्रीय सेवा योजना तरुणाईला योग्य दिशा देण्याचे कार्य करीत असून रासेयोची उद्देशिका तंतोतंत अभ्यास करून जीवनात आचरणात आणली तर चांगले नेतृत्व तयार होईल, असे प्रतिपादन निसर्ग सेवा समिती वर्धाचे अध्यक्ष श्री मुरलीधर बेलखोडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा महाराज बाग चौकातील दीक्षांत सभागृहात मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री बेलखोडे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून निसर्ग सेवा समिती वर्धाचे अध्यक्ष श्री मुरलीधर बेलखोडे, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे, प्रभारी विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ, रासेयो नागपूर जिल्हा समन्वयक डॉ. राजू बुरीले यांची उपस्थिती होती. पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट स्वयंसेवक, उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी तसेच उत्कृष्ट महाविद्यालयांचे अभिनंदन करीत व्यक्तीचा नसून हा कार्याचा सत्कार असल्याचे श्री बेलखोडे पुढे बोलताना म्हणाले. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे हिच त्यांच्यासाठी मोठी भेट आहे. तुम्ही वागाल तसे मुले वागतात. त्यामुळे आई-वडिलांची जबाबदारी मोठी असून युवकांना मूल्यशिक्षण देणे काळाची गरज असल्याचे ते म्हणाले. रासेयोचे प्रथम समन्वयक एस. एस. सुब्बाराव यांच्यापासून वृक्ष लागवड व संवर्धन आदी पर्यावरण क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा घेतली असल्याचे श्री बेलखोडे म्हणाले. प्राणवायू तसेच पाणी सर्वांची गरज आहे. त्यामुळे वर्धा येथे उजाड अश्या टेकडीवर तब्बल एक लाख पेक्षा अधिक झाडे लावत त्याचे संगोपन केल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच धाम नदी परिक्रमा करीत सूक्ष्म अभ्यास अहवाल सादर करण्यात आला. यातून धाम नदीचा उगम होत असलेल्या ठिकाणी झरे बुजले होते. जिल्हा प्रशासनाच्या वतीने झरे मोकळे केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी जलवायू परिवर्तन या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी रासेयोमध्ये कार्य करणारा विद्यार्थी समाजात मोठा कार्यकर्ता बनतो, असे सांगितले. पूर्वी निसर्गात मनसोक्तपणे वावरता येत होते. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत निसर्ग हरवत चालला असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पंचमहाभूत म्हणजेच निसर्ग वाचविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पुढे येण्याचे आवाहन डॉ. दुधे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी २४ सप्टेंबर हा दिवस दरवर्षी वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी तसेच महाविद्यालयांना पुरस्कार दिल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे झालेल्या आव्हान शिबिरात संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यापीठाचा प्रथम क्रमांक आल्याची त्यांनी सांगितले तर सोलापूर येथील कार्यक्रमात एकूण १९ पैकी १४ पुरस्कार विद्यापीठाला आपल्या स्वयंसेवकांमुळे मिळाल्याचे डॉ. पिसे यांनी सांगितले. या कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या हस्ते उत्कृष्ट स्वयंसेवक उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी तसेच उत्कृष्ट महाविद्यालय यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात स्वयंसेवक संस्कृती पेटकर, तेजस सोनसरे व कार्यक्रम अधिकारी डॉ. महेश गायधने यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांनी केले तर आभार नागपूर जिल्हा समन्वयक डॉ. राजू बुरीले यांनी मानले.

## उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार







उत्कृष्ट महाविद्यालय श्रेणीत निकालस महिला महाविद्यालय नागपूरचा पुरस्कार प्राचार्य डॉ. सीमा सोमलवार, दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसी नागपूरचा पुरस्कार प्राचार्य डॉ. उज्वला महाजन, रामकृष्ण वाघ कॉलेज बोखारा नागपूरचा पुरस्कार प्राचार्य डॉ. मनीष वानखडे, श्री लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळचा पुरस्कार प्राचार्य डॉ. तीर्थराज कापगते, एन. जे. पटेल मोहाडीचा पुरस्कार प्राचार्य डॉ. सुरेंद्र पवार तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय वर्धाचा पुरस्कार प्राचार्य डॉ. मिलिंद सवई यांनी स्वीकारला.

## उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार








उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी श्रेणीत निकालस महिला महाविद्यालय नागपूरच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना लांडे, दादासाहेब बालपांडे कॉलेज ऑफ फार्मसीचे कार्यक्रम अधिकारी श्री सचिन मेंढी, रामकृष्ण वाघ कॉलेज ऑफ बोखाराचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अर्चना काहाळे पत्की, श्री लेमदेव पाटील महाविद्यालय मांढळचे कार्यक्रम अधिकारी डॉ. महेश गायधने यांचे एन.जे. पटेल कॉलेज ऑफ मोहाडीचे कार्यक्रम अधिकारी डॉ. महेशकुमार भैसारे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय वर्धाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक मगरदे यांना सन्मानित करण्यात आले.

## उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार

उत्कृष्ट स्वयंसेवक श्रेणीत सिटी प्रीमियर कॉलेजचा विद्यार्थी तेजस सोनसरे, जवाहरलाल नेहरू कॉलेज वाडी येथील विद्यार्थिनी कु. ज्योती पटले, राणी लक्ष्मीबाई कॉलेज सावरगाव येथील विद्यार्थिनी कु. आरती सावरकर, ताई गोलवलकर कॉलेज रामटेक मधील विद्यार्थी अमय अवथरे, स्व. निर्धन पाटील वाघाये कॉलेज लाखनी येथील विद्यार्थी प्रज्वल सावरकर, बजाज सायन्स कॉलेज वर्धा येथील विद्यार्थिनी कु. संस्कृती पेटकर यांचा सत्कार करण्यात आला.







## महिलांनी अत्याचाराप्रती जागरूक राहावे -रश्मिता राव
### विद्यापीठात महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती कार्यशाळा








महिलांनी अत्याचाराप्रती जागरूक राहत तक्रारीसाठी पुढे येण्याचे आवाहन नागपूरच्या पोलीस उपायुक्त रश्मिता राव यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर कार्यशाळा अंबाझरी मार्गावरील गुरुनानक भवन येथे शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली. या कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून रश्मिता राव मार्गदर्शन करीत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे होते तर प्रमुख अतिथी म्हणून नागपूरच्या पोलीस उपायुक्त रश्मीता राव, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्ष डॉ. शालिनी लिहितकर, सदस्य डॉ. वंदना धवड यांची उपस्थिती होती. महिला अत्याचाराच्या घटना, प्रशासकीय साधने आणि तक्रार आल्यास काय करायला हवे अशा तीन टप्प्यात राव यांनी महिला अत्याचार व सुरक्षिततेबाबत भाषणात मार्गदर्शन केले. घराच्या उंबरठ्याबाहेर येऊन सर्वच क्षेत्रात कार्य करीत आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने महिला कार्य करीत आहे. मात्र, त्यांना त्या तुलनेत मोबदला आणि सुरक्षा मिळताना दिसत नाही. पोलीस विभाग महिलांना सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा देण्याचा प्रयत्न करते. कार्यस्थळी महिलांना अधिकाधिक सुरक्षा देण्याचे कार्य शैक्षणिक संस्थांना करावयाचे आहे. घटना घडल्यास संस्थांनी देखील पीडीतेचे तक्रार देण्याबाबत मनोबल वाढविले पाहिजे, असे राव म्हणल्या. कार्यस्थळी अत्याचार प्रकरणाच्या अनेकदा तक्रारी पुढे येत नाही. त्यात कारवाईस मर्यादा येतात. मात्र, पोक्सो कायद्यात तक्रार न देणे देखील गुन्हा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक शाळा, महाविद्यालय, विविध संस्था या ठिकाणी अंतर्गत समित्या आहेत. या समित्या केवळ नाममात्र नसाव्या. महिलांना बोलते करावे. सोबतच महिला सुरक्षिततेबाबत नियमित कार्यक्रमांचे आयोजन करावे असे राव म्हणाल्या. शैक्षणिक परिसरात पोलिसांचे पेट्रोलिंग झाल्यास सुरक्षिततेत वाढ होईल. या सोबतच शैक्षणिक क्षेत्रात दुर्लक्षित असलेल्या ठिकाणांचा शोध घेत त्या ठिकाणी सीसीटीव्ही व अन्य सुरक्षा उपाय योजना करण्याचे आवाहन त्यांनी केले. पोलीस अधिकारी होण्यापूर्वी शिक्षण घेत असताना आलेले अनुभव विषद करताना रश्मीता राव यांनी अनेक ठिकाणी मुली असुरक्षित असल्याचे सांगितले. सार्वजनिक ठिकाणी, शैक्षणिक परिसरात घटना होताना दिसून येत असल्याने प्रशासकीय सुरक्षा साधनांमध्ये वाढ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पीडीतेस तक्रार करता यावी म्हणून ऑनलाइन -ऑफलाइन अशी सहज सुविधा मिळावी. तक्रार पेटीची संस्कृती यावी, संस्थांमध्ये चर्चासत्र आयोजित व्हावे, सोबतच महिलांचे नेटवर्क असावे असे त्या म्हणाल्या. शैक्षणिक क्षेत्रात रहिवासी परिसर असेल तर अन्य लोकांना प्रतिबंध करावा. सुरक्षा रक्षक नेमत नोंदणी रजिस्टर करावे. शैक्षणिक क्षेत्रात सुरक्षिततेविषयी मुलींमध्ये विश्वास निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. सोबतच त्यांनी भारतीय न्याय संहितेतील महिला सुरक्षिततेबाबत असलेल्या कायद्यांची माहिती दिली. चुकीचे घडले असेल तर पीडीतेला दोष देऊ नका. तिच्या चारित्र्यावर संशय घेऊ नका. सोबतच कारवाई करण्यास विलंब करू नका असे देखील त्या म्हणाल्या. महिला सुरक्षा माझ्या हृदय स्थानी असल्याने पोलीस विभागात आले असल्याचे राव म्हणाल्या.

अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी सामाजिक मूल्यांची ऱ्हास होत असल्याने महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढत असल्याचे सांगितले. अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी चांगल्या लोकांनी एकत्र आले पाहिजे. पोलीस हा त्यावरील उपाय नसून समाज हाच त्यावर उपाय असल्याचे डॉ. दुधे म्हणाले. त्यामुळे सांस्कृतिक मूल्यांना टिकवून ठेवण्याची आपली जबाबदारी आहे. मानव म्हणून समाजामध्ये जागृतीचे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.धार्मिक मूल्यातून समाज टिकून राहत असून गौतम बुद्ध, भगवान महावीर यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केल्यास महिला सुरक्षा आपोआप होईल असे डॉ. दुधे म्हणाले. प्रास्ताविक करताना डॉ. शालिनी लिहितकर यांनी महिलांच्या सशक्तिकरणासाठी समाजाची मानसिकता बदलण्याची गरज व्यक्त केली. शैक्षणिक क्षेत्रात महिलांची सुरक्षा महत्त्वपूर्ण आहे. कोलकाता आणि बदलापूर येथील घटनांमुळे हा धोका पुढे आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने याची गंभीर दखल घेतली असून त्यामुळे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी समितीच्या अध्यक्षा डॉ. शालिनी लिहितकर, सदस्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे, डॉ. वंदना धवड, डॉ. राजेंद्र उतखेडे, माधुरी साकुलकर, मंजुषा जोशी, अन्नपूर्णा पारधी, दिव्या राठोड, दिपाली मानकर यांच्यासह सदस्यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार सदस्य डॉ. वंदना धवड यांनी मानले.

## महिला सुरक्षिततेबाबत वक्त्यांचे मार्गदर्शन

मुख्य कार्यक्रमानंतर महिला सुरक्षिततेबाबत मार्गदर्शक तज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. यामध्ये उच्च न्यायालयातील वकील ॲड. स्मिता शिगलकर यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ, प्रतिबंध आणि निवारण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे २०१५ चे दिशानिर्देश त्याचप्रमाणे विविध घटनांचे उदाहरण देत लैंगिक अत्याचाराबाबत माहिती दिली. श्रीमती माधुरी साकुलकर यांनी महिला सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. तर उच्च शिक्षण विभागातील श्री अनिल बोंद्रे यांनी महाराष्ट्र शासनाकडून सुरू करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीबाबत माहिती दिली. यावेळी मंचावर उच्च न्यायालयातील वकील ॲड. स्मिता शिगलकर, श्रीमती माधुरी साकुलकर, श्री अनिल बोंद्रे, डॉ. शालिनी लिहितकर, डॉ. प्रवीणा खोब्रागडे व डॉ. वंदना धवड यांची उपस्थिती होती.






## चारित्र्य हाच मानवाचा 'धर्म' - फणशीकर
### विद्यापीठात पद्मभूषण मौलाना अब्दुल करीम पारेख स्मृती व्याख्यानमाला

वाहणे हा जसा पाण्याचा धर्म तर वर जाणे हा अग्नीचा धर्म आहे. त्याचप्रमाणे चारित्र्य हा मानवाचा धर्म असल्याचे प्रतिपादन हितवादचे संपादक श्री विजय फणशीकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पद्मभूषण मौलाना अब्दुल करीम पारेख स्मृती व्याख्यानमाला शुक्रवार, दिनांक २० सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली. विद्यापीठ दीक्षांत सभागृहात आयोजित व्याख्यानमालेत 'चरित्र उभारणीत धर्माची भूमिका' या विषयावर श्री फणशीकर मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी व्याख्याते म्हणून हितवादचे संपादक श्री विजय फणशीकर, ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, दानदाते अब्दुल माजीद पारेख यांची उपस्थिती होती. दिवंगत पद्मभूषण मौलाना अब्दुल करीम पारेख यांच्याशी असलेल्या त्यांच्या जवळच्या सहवासाबद्दल श्री फणशीकर यांनी पुढे बोलताना माहिती दिली. मौलाना अब्दुल करीम पारेख यांच्या अंत्यसंस्काराला त्यांच्या चारित्र्यामुळे सर्व स्तरातील लोकांचा मोठा जनसमुदाय आला होता. एक चांगले चारित्र्य निर्माण करण्यासाठी मौलाना यांनी पवित्र कुराणमधील वर्तणुकीच्या ७५ आज्ञांचा परिचय कसा करून दिला याची आठवण त्यांनी करून दिली. मौलाना अब्दुल करीम पारेख यांना समाजात सन्मान प्राप्त झाला होता. सर्वसामान्यांपासून नामवंत व्यक्ती देखील त्यांच्याकडे जात होते. असे त्यांचे चारित्र्य होते. यांचे व्यक्तिमत्व लोकांना आकर्षित करणारे असल्याचे श्री फणशीकर म्हणाले. मौलाना अब्दुल करीम पारेख यांना मिळालेला सन्मान म्हणजे नागरिकांना आपला सन्मान वाटत होता. त्यांच्यासाठी प्रत्येक व्यक्ती समान होती. त्यांना कोणत्याही जाती- धर्माची सीमा नव्हती. असीम बुद्धिमत्त्वाचे ते धनी होते. त्यांच्या छोट्या शब्दातून मोठे विचार व्यक्त होत होते. 'चरित्र उभारणीत धर्माची भूमिका' या विषयावर बोलताना धर्म हा शब्द न वापरता चारित्र्यनिर्मितीचा संदेश घराघरात पोहोचवण्यासाठी धर्माचा वापर करणार असल्याचे फणशीकर यांनी सांगितले. "भगवान राम आपल्या पत्नीशी वचनबद्ध राहिले, हा त्यांचा धर्म होता. राजा आपल्या प्रजेची काळजी घेतो, हा त्याचा धर्म आहे. चांगले गुण मानवतेसाठी सामान्य असतात आणि प्रत्येक धर्माने याचे वर्णन वेगवेगळ्या प्रकारे केले आहे. धर्म या शब्दाचा वापर कल्पना मर्यादित करतो तर धर्म त्याचा विस्तार करतो," असे त्यांनी निरीक्षण केले. खोटे न बोलणे, उधळपट्टी न करणे, पाठीमागून वार न करणे, गॉसिप न करणे, ज्या वस्तूंवर अधिकार नाही अशा वस्तू घेऊ नका, गरिबांना अन्न देणे अशा काही वैशिष्ट्यांची माहिती देत "चांगल्या गुणांचा धर्माशी काय संबंध?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. स्वामी विवेकानंद आणि येशू ख्रिस्त यांच्या संदेशाचा विस्तार करण्यासाठी 'श्रीमद भगवद् गीता आणि पवित्र कुराण' मधील दाखले त्यांनी दिले. व्यक्तीला अभिमानापासून मुक्त व्हायला हवे आणि जीवनात महान गोष्टी साध्य करण्यासाठी पूर्वग्रह बाजूला सारायला पाहिजे. मन दोन अंतर्मनात डोकावते तेव्हा चारित्र्याची व्याख्या त्याच्या निवडीद्वारे केले जाते. एक पापांकडे खेचणे आणि दुसरा विवेक जिवंत ठेवणे, असे दोन पर्याय व्यक्तीसमोर असतात. कोणता पर्याय व्यक्ती निवडतो यावर त्याचे चारित्र्य परिभाषित होते, असे फणशीकर म्हणाले.

अब्दुल मजीद पारेख यांनी श्री विजय फणशीकर यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. तत्पूर्वी, अब्दुल मजीद पारेख यांनी लोकांना धार्मिक वैमनस्य सोडून धार्मिक अस्मितेवरून एकमेकांशी लढण्याऐवजी सामाजिक समस्यांविरोधात एकत्र लढण्याचे आवाहन केले. ते पुढे म्हणाले की, ज्या देशांनी धार्मिक अतिरेक सोडला ते देश आता विकसित झाले आहेत. कार्यक्रमाची अध्यक्षता करताना अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी म्हणाले की, व्यक्तीचे चारित्र्य समाजाचे चारित्र्य घडवते, जे राष्ट्राचे चरित्र दर्शवते. 'वसुधैव कुटुंबकम'ने विविधतेतील एकतेवर आधारित भारताचे चरित्र दर्शवले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन माजी हिंदी विभाग प्रमुख डॉ. विणा दाढे यांनी केले तर आभार ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



## समता फाउंडेशनच्या सहकार्याने कौशल्य निर्माण

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि समता फाउंडेशन दरम्यान सामंजस्य करार

समता फाउंडेशनच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिकांच्या कौशल्यात वाढ केली जाणार आहे. याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने समता फाउंडेशन सोबत सामंजस्य करार (MoA) केला आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात मंगळवार दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित एका कार्यक्रमात समंजस्य कराराला मूर्त रूप देण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. निशिकांत राऊत, एनर्जी व टेक्नोलॉजी पार्कचे संचालक डॉ. प्रकाश ईटनकर, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सहायक संचालक डॉ. समित माहोरे, पदव्युत्तर

विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे, वाणिज्य विभागाच्या डॉ. अपर्णा समुद्रा तसेच समता फाउंडेशनच्या शिक्षण शाखेच्या प्रमुख सौ. प्रियंका मुंडे, श्री रवींद्र गर्जे उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेत्रात येत असलेल्या नागपूर, गोंदिया, भंडारा आणि वर्धा येथील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांसाठी आयटी आणि फॅशन डिझाइनचे प्रमाणपत्र आणि प्रगत प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविले जाणार आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्थानिक नागरिक तसेच विद्यार्थ्यांना कौशल्य प्राप्त होणार आहे. याकरिता समता फाउंडेशन आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार (MoA) करण्यात आला आहे. या कराराद्वारे सध्या ५,००० हून अधिक विद्यार्थी या अभ्यासक्रमांचा लाभ घेत आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना करिअरमध्ये प्रगतीची संधी मिळेल आणि त्यासोबतच स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जाईल, असा विश्वास कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी व्यक्त केला.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ई-समर्थ प्रणाली कार्यान्वित

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ई-समर्थ प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. विद्यापीठातील विद्यार्थी विषयक, विद्या विषयक, वित्त विषयक तसेच विद्यापीठ प्रशासनातील विविध कार्याचे ऑनलाईन कार्यान्वयन करण्याकरीता केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेले ई-समर्थ पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

साधारणतः गेल्या २ वर्षांपासून ई-समर्थ सर्व समावेशक ऑनलाईन कार्यप्रणालीच्या कार्यान्वयनासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय तसेच राज्य शासनाकडून पाठपुरावा सुरू आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने देखील गत काही महिन्यात याच्या अंमलबजावणीने वेग धरला असून आता सामान्य प्रशासकीय कामकाजाव्यतिरिक्त विद्यार्थी संबंधित प्रवेश, परीक्षा व निकाल यासाठी सुद्धा ई-समर्थ प्रणालीची अंमलबजावणी करण्याची तयारी विद्यापीठाने सुरु केली आहे. सदर प्रणालीमध्ये विद्यापीठाच्या कार्याशी संबंधित ४० पेक्षा अधिक मॉड्युल्य असून यापैकी अधिकांश मॉड्युल्यवर नोंदणी करुन अधिकार्यांचे प्रशिक्षण व संबंधित विभागाचे डाटा अपलोडींग याकरीता कालबद्ध नियोजन करून येत्या काही काळात विद्यापीठाची सर्व प्रशासकीय कामे ऑनलाईन पद्धतीने करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कामी लागली आहे. हिवाळी २०२४ परीक्षा संदर्भात विद्यापीठातील सर्व पदव्यूत्तर शैक्षणिक विभागांच्या परीक्षा संबंधित कार्यवाही या प्रणालीद्वारे घेण्याचे ठरवले आहे. तसेच सदर प्रणालीचा उपयोग शक्यतोवर उन्हाळी २०२५ परीक्षांपासून विद्यापीठाच्या सर्व परीक्षा संदर्भात करावयाचे नियोजन आहे. ई-समर्थ प्रणालीमुळे परीक्षांशी संबंधित खर्च कमी करण्यास मदत होणार आहे. शिवाय प्रशासकीय कामकाजात गती येत वेळेची बचत होणार आहे. या प्रणालीमुळे प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येणार आहे.





# लोकशाहीचे निर्माण ज्यांच्याकरिता त्यांच्याकडेच दुर्लक्ष
## सेवानिवृत्त न्यायाधीश आर.सी. चव्हाण यांचे प्रतिपादन
## विद्यापीठ पदव्युत्तर विधी विभागात मदर टेरेसा व्याख्यानमाला

लोकशाही ज्यांच्याकरिता निर्माण झाली, सद्यस्थितीत त्यांच्याकडेच दुर्लक्ष होत असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. आर. सी. चव्हाण यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर विधी विभागाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसरातील रामानुजन सभागृह येथे शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी मदर टेरेसा व्याख्यानमाला पार पडली. यावेळी 'लोकशाही आणि सकारात्मक कृती' या विषयावर न्यायमूर्ती श्री. चव्हाण मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. आर. सी. चव्हाण, आदिवासी अपर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे (आयएएस), पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना श्रद्धांजली अर्पित केली गेली. न्यायमूर्ती चव्हाण यांनी विषयावर बोलताना भारतातील भेदभावाचा इतिहास, प्रकार आणि सध्याच्या स्थितीवर चर्चा केली. देशात ७६ वर्षांपूर्वी लोकशाही प्रस्थापित झाली. त्यापूर्वी १५० वर्षे इंग्रजांनी राज्य केले. तर पूर्वी भारतीय शासकांचे राज्य होते. त्यावेळी असलेला जाती भेदभावाने विभाजीत समाज आज देखील कायम आहे. देशात लोकशाहीच्या ७६ वर्षांनंतर देखील आपण यामध्ये बदल घडवू शकलो का? खरा बंधुभाव निर्माण करण्याचा प्रयत्न झाला का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. लोकशाहीने तळागाळाच्या समाजातील व्यक्ती मोठ्या पदावर जाऊ शकतात. मात्र, सामाजिक स्तर बदलला नाही. आपला समाज विभाजित ठेवायचा की एकत्र हे तुम्हाला ठरवायचे आहे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा संत तुकाराम, रवींद्रनाथ टागोर, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या संत- महात्मे आणि नेत्यांनी समाजातील विषमतेवर प्रहार केला. संविधानात आरक्षणाची सकारात्मक कृती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते योग्य होती. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर सर्वोच्च न्यायालयात अनुसूचित जातीतील केवळ एकमेव न्यायाधीश असणे हे माझ्या मते भूषणावह नसल्याचे ते म्हणाले. समाजाची मानसिकता बदलली पाहिजे. आरक्षण महत्त्वाचे आहे. असमानता नष्ट करण्यासाठी १०० वर्ष तरी राहणार असले तरी आरक्षण चालेल, असे न्यायमूर्ती चव्हाण म्हणाले. १९४७ मध्ये आपली आर्थिक स्थिती आणि आताची आर्थिक स्थिती वेगळी आहे. मात्र, आरक्षणासाठी आर्थिक निकष नसावे, असे ते म्हणाले. १९९१ पासून सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांबाबत बोलताना त्यांनी आयएमएफ, जागतिक बँकेच्या मदतीने सुधार झाला असला तरी मूलभूत तत्त्वांकडे दुर्लक्ष केल्या गेल्याचे ते म्हणाले. शिक्षणाचा मूलभूत अधिकार कायदा (आरटीई) बाबत त्यांनी त्यांच्या भाषणातून लक्ष वेधले. नैसर्गिक संसाधनांचा वापर कोण करीत आहे, असे सांगत मूलभूत हक्काच्या संरक्षणासाठी लढा उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हा तुमच्या भविष्याचा प्रश्न आहे. तुमचे भविष्य नष्ट होऊ देऊ नका असे ते पुढे बोलताना म्हणाले.

आदिवासी अप्पर आयुक्त श्री रवींद्र ठाकरे यांनी आदिवासी समुदायाच्या विकासासाठी विभागाकडून होत असलेल्या विविध योजना व कार्याची माहिती दिली. प्रशासनासोबतच सक्रिय समुदायाचा सहभाग आदिवासी समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. आदिवासी समाजाचे सामाजिक कल्याण साधण्यासाठी विश्वास निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी यशस्वीपणे मदत केली जात आहे. शैक्षणिक प्रगतीतून समाजामध्ये बदल दिसून येतल्या येत असल्याचे ठाकरे म्हणाले. पदव्युत्तर विधी विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी सत्रांचे संयोजक म्हणून समाजातील भेदभावामुळे मानवतेला भेडसावणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रीत करत बदलाची आवश्यकता व्यक्त केली. डॉ. विजेता उइके यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले, तर शिखा गुप्ता यांनी सत्राचे संचालन केले. या सत्रात पदव्युत्तर विधी विभागातील विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.




# गांधींना समजायचे असेल तर गांधींकडे परत जावे लागेल
## माजी उप-प्राचार्य प्रो. एस.बी. सिंग यांचे प्रतिपादन
## विद्यापीठ महात्मा गांधी विचारधारा विभागात ग्रंथसमिक्षा व ग्रंथचर्चा



महात्मा गांधी यांना जाणून घ्यायचे असतील तर त्यांच्याकडे परत जावे लागेल, असे प्रतिपादन व्हीएमव्ही महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रो. एस.बी. सिंग यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महात्मा गांधी विचारधारा विभाग येथे नारायण देसाई लिखित 'माय गांधी' या पुस्तकावर आधारित ग्रंथसमिक्षा व ग्रंथचर्चा शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडले. या कार्यक्रमात प्रो. सिंग मार्गदर्शन करीत होते. या कार्यक्रमाचे आयोजन पदव्युत्तर गांधी विचारधारा विभागातील माजी विद्यार्थी संघटनेने केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील शांती अध्ययन विभागातील माजी शिक्षक डॉ. नृपेन्द्रप्रसाद मोदी होते. या कार्यक्रमात ग्रंथसमिक्षक म्हणून व्हीएमव्ही महाविद्यालयाचे माजी उप-प्राचार्य प्रो. एस.बी. सिंग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांची उपस्थिती होती. नारायण देसाई लिखित 'माय गांधी' या पुस्तकाचे पुनवरालोकन करताना प्रो. सिंग यांनी महात्मा गांधी हे प्रेममूर्ती असल्याचे सांगितले. 'माय गांधी' हे पुस्तक नारायण देसाई यांनी लिहिलेले आहे आणि ते १९९९ मध्ये प्रकाशित झाले होते. नारायण देसाई हे महादेवभाई देसाई यांचे पुत्र होते. ज्यांनी २५ वर्षे महात्मा गांधींचे प्रधान सचिव म्हणून काम केले. त्यांनी साबरमती येथे जवळपास २४ वर्षे घालवली. पुस्तकाचे वर्णन करताना उप-प्राचार्य प्रो. सिंग म्हणाले, या पुस्तकाचे वर्गीकरण आत्मचरित्र, आत्मचरित्र, संस्मरण किंवा क्रॉनिकल असे केले जाऊ शकत नाही. परंतु पुस्तक सर्वांचे मिश्रण आहे. हे पुस्तक नारायण देसाई यांच्यावर महात्मा गांधींची छाप पाडणारे लेखन आहे, असेही ते म्हणाले. नारायण देसाई यांनी महात्मा गांधी यांना नेहमी तटस्थपणेच्या भूमिकेत पाहिले आहे. महात्मा गांधी हे जगासाठी महात्मा होते तर नारायण देसाई यांच्यासाठी मित्र होते, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नृपेंद्रप्रसाद मोदी यांनी मनोगत व्यक्त करताना नारायण देसाई लिखित 'माय गांधी' या पुस्तकावर महात्मा गांधी अभ्यासकांनी सखोल अध्ययन करीत चर्चा करण्याचे आवाहन केले. महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांनी देखील यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन श्री रवी गुडधे यांनी केले. कार्यक्रमाला पदव्युत्तर महात्मा गांधी विचारधारा विभाग माजी विद्यार्थी संघटनेचे विद्यार्थी व गांधी अभ्यासक उपस्थित होते.



# महात्मा गांधींच्या समांतर संस्कृतीतून लोकशाही मूल्ये

## सेवाग्राम आश्रमाचे सचिव विजय तांबे यांचे प्रतिपादन

## महात्मा गांधी विचारधारा विभागात गांधी जयंती सप्ताह

महात्मा गांधी यांनी सर्जनशील विचार असलेली समांतर संस्कृती निर्माण करून स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता ही न्यायावर आधारलेली लोकशाही मूल्ये भारतात रुजवली, असे प्रतिपादन वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाचे सचिव श्री विजय तांबे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने गांधी जयंती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताह अंतर्गत 'तंत्र युगातील प्रश्न आणि गांधी उपाय' या विषयावर शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित विशेष व्याख्यानात तांबे मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री बिंझाणी नगर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संदीप तुंडूरवार यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाचे सचिव श्री विजय तांबे, प्रमुख अतिथी म्हणून गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांची उपस्थिती होती. महात्मा गांधी यांनी पाश्चिमात्य संस्कृतीला ठामपणे नकार देण्याचे धाडस केले. जे त्यांच्या पूर्वी कोणीच केले नव्हते. त्याचबरोबर सॉक्रिटिस नंतर त्या परंपरेतील चिकित्सापूर्ण चिंतनातून महात्मा गांधी यांनी अभूतपूर्व परिवर्तनाची सुरुवात आपल्याला करून दिली, असे श्री तांबे पुढे बोलताना म्हणाले. महात्मा गांधींनी त्यांच्या रचनात्मक कार्यक्रमांमधून अनेक संस्था निर्माण केल्या आणि नवा भारत देश घडविला. या पुढचा काळ समूहाने एकत्र येऊन आणि पर्यावरणाचे संरक्षण साधत उद्योगांचा करावा लागेल. गरजांवर आणि खर्चांवर मर्यादा आणणारी उद्यमशीलता करावी लागणार आहे. ग्रामीण भागातील उत्पादन आणि प्रक्रिया आधारित अर्थव्यवस्था प्रोत्साहित करावी लागेल, असे श्री तांबे म्हणाले. देशातील शेवटच्या व्यक्तीला सुद्धा आत्मसन्मानपूर्वक रोजगार गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य आणि निवारा इत्यादी सुविधा देता आल्या पाहिजे तसेच पर्यावरणाचे संरक्षण यावर नवी संस्कृती निर्माण करता येते असा विश्वास महात्मा गांधी यांनी आपल्या प्रयोगांमधून दाखवून दिलेला आहे, असे श्री तांबे म्हणाले. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या अति आधुनिक तंत्रज्ञानाने मानवाला कष्ट करू नका आणि विचारही करू नका या संकटावरच्या स्थितीत आणून सोडले आहे. आपल्याकडे शब्दांची संपत्ती सुद्धा नष्ट होण्याच्या या मार्गावर आणि ऑटोमयझेशन या यंत्र युगात बेरोजगारी आणि विषमतेचा दर गेल्या १२५ वर्षात सर्वाधिक आहे, असा ऑक्सकॅन या संस्थेचा अहवाल आहे. समाजाला जर माझी गरजच उरली नसेल तर माझ्या आत्मसन्मानाचे काय? असा प्रश्न श्री तांबे यांनी उपस्थित केला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पदव्युत्तर गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा.प्रमोद वाटकर यांनी गांधी जयंती सप्ताहाच्या आयोजनामगील भूमिका विशद केली. युवाशक्तीला सन्मानपूर्वक जीवन जगता यावे याकरिता योग्य मार्गदर्शन आणि चुकीच्या माहितीच्या मायाजालातून सावध करण्याचे प्रयोजन असल्याचे सांगितले. विकसित झालेल्या देशांमधून जगाला विनाशाकडे जाणारा मार्ग दिसत आहे. यावर अनेक देश गांधी विचारांनी प्रेरित होऊन संशोधन आणि उपायात्मक कार्यक्रमांची आखणी करीत आहे. महात्मा गांधी यांनी वैयक्तिक प्रयत्नांतून सामाजिक बदल घडवून आणले. या गांधी परंपरेची जाणीव यावेळी प्रा. वाटकर यांनी करून दिली. डॉ. संदीप तुंडूरवार यांनी आपल्या अध्यक्षीय संबोधनातून भारतातील संसाधने, गरजा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर काही उदाहरण देत सांगितला. तंत्रज्ञान हे नफेखोरीवर आधारित असून मानवी नैतिकता जपताना महात्मा गांधींना आपण विसरू शकणार नाही, असे ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अफाट संकटाचा सामना आपल्याला स्वतःपासून सुरुवात करून अतिरेकी तंत्रज्ञान नाकारावे लागेल. कायदे जेव्हा अपुरे पडतात तेव्हा महात्मा गांधीजींची आदर्श मूल्ये आपल्याला उपयोगी पडतात, असेही डॉ. तुंडूरवार म्हणाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिवंगत कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. संचालन लेखिका डॉ. मंजुषा सावरकर यांनी केले तर आभार डॉ. अपरुप अडावदकर यांनी मानले. कला व समाज विज्ञान संस्था, मॉरिस कॉलेज, प्रेरणा कॉलेज, श्री बिंझानी नगर महाविद्यालय येथील शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह अन्य मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

# हंगेरी विद्यापीठाची पीएचडीसाठी श्रुतीला फेलोशिप

## विद्यापीठ मॉलिक्युलर बायोलॉजी व जेनेटिक इंजिनिअरिंग विभागाचा बहुमान परिचय कार्यक्रमात श्रुती तीरपुडेचा सत्कार




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मॉलिक्युलर बायोलॉजी व जेनेटिक इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थिनी श्रुती तिरपुडे हिला हंगेरी येथील विद्यापीठाची पीएचडीसाठी फेलोशिप प्राप्त झाली आहे. हंगेरी विद्यापीठाकडून श्रुतीला प्रतिमाह १ लाख ६० हजार रुपये फेलोशिप प्राप्त होणार आहे. विभागातील विद्यार्थिनीच्या या यशामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला बहुमान प्राप्त झाला आहे. विभागात आयोजित परिचय कार्यक्रमात श्रुती तिरपुडे हिचा सत्कार करण्यात आला.

मॉलिक्युलर बायोलॉजी व जेनेटिक इंजिनिअरिंग विभागात आयोजित परिचय व सत्कार कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अलाहाबाद येथील प्रयागराज विद्यापीठाचे माजी संचालक डॉ. प्रमोद रामटेके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या माजी विभाग प्रमुख डॉ. अलका चतुर्वेदी, दिल्ली येथील जामिया विद्यापीठातील डॉ. मोहम्मद रिजवान यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची अध्यक्षता विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले यांनी केली. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. प्रमोद रामटेके यांनी आधुनिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विदेशातील नामांकित विद्यापीठातून ज्ञान प्राप्त करून घेण्याची धडपड केली पाहिजे, असे सांगितले. श्रुती तिरपुडे यांना हंगेरी येथील नामांकित विद्यापीठात प्रवेश मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केल्याचे सांगत अन्य विद्यार्थ्यांना देखील प्रवेश मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. डॉ. अलका चतुर्वेदी यांनी मार्गदर्शन करताना सर्वांसोबत विनम्रतेने व आदराने वागले पाहिजे असे सांगितले. डॉ. मोहम्मद रिजवन यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दृष्टिकोन स्पष्ट असायला हवा. विद्यार्थ्यांनी पूर्ण शैक्षणिक वर्षात केवळ अभ्यासाकडे लक्ष द्यावे. सोबतच पूर्णवेळ उपस्थित राहिले पाहिजे, अशा तीन अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले यांनी मार्गदर्शन करताना विभागातील अत्याधुनिक प्रयोगशाळा सुविधा आणि तज्ज्ञ शिक्षक याबाबत माहिती दिली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर फायदा विद्यार्थ्यांनी घेऊन मोठे पद प्राप्त करीत विद्यापीठ व विभागाचा नावलौकिक वाढवावा, असे आवाहन केले.

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षांमध्ये दोन विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा, दोन विद्यार्थ्यांनी महाज्योती फेलोशिप, नेट आणि यूपीएससी स्पर्धा परीक्षा व दोन विद्यार्थ्यांनी पीएचडी फेलोशिप प्राप्त केली. यात श्रुती तिरपुडे या विद्यार्थिनीला हंगेरी येथील नामांकित अशा विद्यापीठांमध्ये बुरशीवर संशोधन पीएचडी करण्याकरिता १ लाख ६० हजार रुपये प्रतिमाह फेलोशिप देऊ केली आहे. त्याचप्रमाणे राहण्याची जेवणाची व प्रवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रुची वासनिक यांनी केले. संचालन प्रा. रेणुका व्यवहारे यांनी केले तर आभार प्रा. माधुरी ठाकरे यांनी मानले.

## अधिकाधिक प्लेसमेंटबाबत चर्चा

कार्यक्रमानंतर लगेच विद्यार्थ्यांना अधिकाधिक रोजगार (प्लेसमेंट) कसे मिळवता येईल, याबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीची अध्यक्षता विभाग प्रमुख डॉ. दयानंद गोगले यांनी केली. बैठकीला विभागातील डॉ. माधुरी ठाकरे, डॉ. स्वाती गोडघाटे, डॉ. शीतल चौधरी, प्रा. रेणुका व्यवहारे, प्रा. अमोल पिंपलशेंडे, प्रा. क्षितिज सहारे आणि प्रमुख अतिथी डॉ. प्रमोद रामटेके, डॉ. अलका चतुर्वेदी, डॉ. मोहम्मद रिजवान यांची उपस्थिती होती.







# आंतरिक विकासातून चांगल्या समाजाची निर्मिती

## श्री किरण गांधी यांचे प्रतिपादन

### विद्यापीठात नैतिकता आणि मूल्यानुसार जगण्यासाठी आंतरिक विकास कार्यशाळा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात 'नैतिकता आणि मूल्यानुसार जगण्यासाठी आंतरिक विकास' या विषयावरील कार्यशाळा रामानुजन सभागृह येथे शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली. विद्यापीठ आयक्यूएसी विभाग आणि आयओएफसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री किरण गांधी यांनी आंतरिक विकासातून चांगल्या समाजातील निर्मिती शक्य असल्याचे सांगितले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयओएफसीचे श्री किरण गांधी, निरंजना गांधी, कनिका अरोरा यांच्यासह अन्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कनिका अरोरा यांनी प्रात्यक्षिकातून समाजामध्ये परस्पर समन्वयाची कशी गरज आहे, याचे महत्त्व पटवून दिले. मार्गदर्शन करताना श्री किरण गांधी यांनी जगात चांगल्या समाजाची निर्मिती करायची आहे. त्याची आपण कल्पना करतो. समस्यांची सोडवणूक करीत प्रयत्न करतो. मात्र, मनुष्याच्या परिवर्तनाशिवाय जग बदलणार नाही, असे त्यांनी सांगितले. नैतिकता आणि मूल्यांनुसार जगण्यासाठी आंतरिक विकासातून चांगल्या समाजाची निर्मिती शक्य आहे. समाजाच्या विकासासाठी विविध धोरणे आखली जातात. धोरण बनविल्याने परिवर्तन होतेच असे नाही. लोकांची नैतिकता बदलेल तेव्हाच समाज बदलेल असे ते म्हणाले. त्यामुळे समाजाच्या विकासासाठी स्वतः पासून बदलास सुरुवात करा, असे ते म्हणाले. अंतरिक विकासाचे सूत्र सांगताना पवित्रता, इमानदारी, निस्वार्थता व प्रेम हे ४ नैतिक मापदंड त्यांनी सांगितले. यावरून आपण स्वतःची ओळख करू शकतो, असे ते म्हणाले. यावेळी आयओएफसी पथकातील सदस्यांनी त्यांचे वेगवेगळे अनुभव विशद करीत स्वतःपासून बदलाची सुरुवात केल्याचे सांगितले. आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य यांनी पथकातील सर्व सदस्यांचे स्वागत करीत विद्यापीठात कार्यशाळेच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका पार पाडल्या बाबत सर्वांचे आभार मानले. कार्यशाळेला विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील शिक्षक संशोधक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी अवतरण दिन उत्साहात



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी अवतरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात गुरुवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामी यांच्या प्रतिमेला हारार्पण केले. यावेळी शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रदीप बिनीवाले, सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार, युडीसी शैलेश राठोड, सर्वश्री गिरीश बडनाके, अनिल खरे, नरेंद्र पवार, मनोज मोरे, कवडू भोयर, विलास कोल्हे, आसिफ शेख, शितल शेटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.





## श्रीचक्रधर स्वामींचा अवतरणदिन मराठी भाषा दिनाशी जोडला जावा- डॉ.अशोक राणा
## सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींची सूत्रे कालातीत - डॉ. कोमल ठाकरे
## भारतीय ज्ञान परंपरेत महानुभाव ज्ञान परंपरा उज्वल- डॉ.संजय दुधे
## श्रीचक्रधर स्वामींचा अवतरणदिनाच्या पूर्वसंध्येला विद्यापीठात विशेष परिसंवादाचे आयोजन

मराठी साहित्याला समृद्ध व संपन्न करून मराठी भाषेचा गौरव करण्यामागे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे मराठी भाषा दिन सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामींच्या अवतरणदिनी साजरा व्हावा, असे विचार सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांनी व्यक्त केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनात बुधवार दिनांक दि.४ सप्टेंबर रोजी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतरणदिनानिमीत्त 'सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारांची वर्तमानकाळातील प्रासंगिकता' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. अशोक राणा (यवतमाळ), डॉ. कोमल ठाकरे (मराठी विभाग तायवाडे महाविद्यालय, नागपूर) पु. श्री. नितीनराज बांधकर (योगेश्वर ग्रंथालय व हस्तलिखित केंद्र, नागपूर), विद्यापीठाचे मानव विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरटी, भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनाचे प्रमुख प्रा.भारतभूषण शास्त्री आदी उपस्थित होते.

तत्कालीन काळातील सामाजिक परिस्थिती आणि आजच्या काळातील परिस्थिती सारखीच असल्यामुळे सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या विचारांची जगाला गरज आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. विचार ही कधीही जूनी न होणारी प्रक्रिया असून सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे सुत्र विश्वतोमुख असून त्यांना कुठल्याही प्रकारचा अवधी नाही, स्वामींचे प्रत्येक सुत्र त्रिकालाबाधित असून ते नुसते विचार सांगण्यासाठी नाहीत तर कृतीत उतरवण्यासाठी आहेत, असे विचार या परिसंवादाचे वक्ते पु.श्री.नितीनराज बांधकर यांनी व्यक्त केले. बदलत्या जीवनात धर्मतत्वज्ञानातील जीवन मुल्यांचा अंगीकार केला तर भारत जगांमध्ये सर्वात सुंदर देश होईल, भारतीय ज्ञानपरंपरेमध्ये महानुभावांची ज्ञानपरंपरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे, असे विचार या परिसंवादाचे अध्यक्ष प्र.कुलगूरू डॉ.संजय दुधे यांनी व्यक्त केले. या परिसंवादाचे प्रास्ताविक अध्यासन प्रमुख प्रा.भारतभुषण शास्त्री, संचालन डॉ. विजया राऊत यांनी केले तर आभार राजकुमार शेंडे यांनी मानले. या परिसंवादाला महानुभाव साहित्याचे अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'हायकू' हा दृश्यअर्थाला कलाटणी देणारा प्रभावी काव्यप्रकार
## कवयित्री व लेखिका मेघना साने यांचे प्रतिपादन
### हेमांगी नेरकर यांचा सहभाग
### विद्यापीठाच्या मराठी विभागात 'काव्यास्वाद, व्याख्यानसत्र'



'हायकू' ही पहिल्या दोन ओळींनंतर तिसऱ्या ओळीत अर्थाला कलाटणी देणारी काव्याची रचना पद्धती आहे. पहिल्या दोन ओळींत समोरील दृश्याचे वर्णन करणे आणि तिसऱ्या ओळीत त्या दृश्यअर्थाला देण्यात येणारी कलाटणी काव्यरूपाचा प्रभावी आणि वेगळा काव्यास्वाद देणारा आहे', असे प्रतिपादन कवयित्री व लेखिका मेघना साने (मुंबई) यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाच्यावतीने 'मराठी काव्यास्वाद : विशेष व्याख्यान सत्रां'तर्गत 'मराठी हायकू आणि त्याची वाटचाल' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

अतिथी कवयित्री व मेघना साने (मुंबई) तसेच 'आरती प्रभू यांची कविता' विषयावर कवी आरती प्रभू (चि. त्र्यं. खानोलकर) यांच्या कन्या हेमांगी नेरकर (मुंबई) यांच्या विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागात आयोजित या सत्रांच्या अध्यक्षस्थानी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे होते. व्याख्यान सत्राच्या सुरुवातीला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या निधनाबद्दल त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. 'मराठी हायकू आणि त्याची वाटचाल' या विषयावर विवेचन करताना मेघना साने यांनी 'हायकू' या जपानमध्ये १७ व्या शतकात सुरु झालेल्या या काव्य प्रकाराच्या इतिहासाला उजाळा दिला. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे १९१६ मध्ये जपानला गेले असता त्यांनी या काव्यप्रकाराबद्दल ऐकले आणि या काव्याची भारताला ओळख करून दिली. सुरुवातीला येथील साहित्य क्षेत्राला ही तीन ओळींची कविता कविताच वाटली नाही. त्यानंतर मात्र, पाच-सात-पाच शब्दांच्या आकृतीबंधातील या काव्यप्रकाराच्या भारतातील रुजुवातीस सुरुवात झाली. कवयित्री शिरीष पै यांनी हा काव्यप्रकार मराठी मातीत रुजविला. सोपे लिहून त्यातून जीवनाचा अर्थ काढणे कठीण आहे. हायकू हा काव्यप्रकार हाताळताना त्यात रिदम आणि त्यातील अर्थ जपला पाहिजे', अशी अपेक्षाही साने यांनी व्यक्त केली.

**भर माध्यान्ह**
**झाडे स्तब्ध उभी**
**सोसत उन्हं**

अशा 'हायकू' या काव्यप्रकारातील विविध रचनाही त्यांनी यावेळी सादर केल्या. 'आरती प्रभू यांची कविता' विषयावर बोलताना कवी आरती प्रभू (चि. त्र्यं. खानोलकर) यांच्या कन्या हेमांगी नेरकर यांनी वडिलांसोबतच्या आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. खानोलकर यांच्या 'रखेली', 'माकडाला चढली भांग' आदी नाटकांना रसिकांच्या मिळालेल्या प्रतिसादाला उजाळा दिला. वडिलांना न सांगता त्यांच्या नाटकाच्या प्रयोगाला गेले असता वडिलांनी आम्हाला थिएटरमधून बाहेर काढले होते', अशा वडिलांच्या आठवणींना नेरकर यांनी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी, मराठी कवितेचा विचार करताना त्याला दीर्घ रूपाची परंपरा असल्याचे सांगितले. गद्यरूपातून व्यक्त करता येणारे सार कविता रूपातून नेमकेपणाने व्यक्त करता येते. कविता रूपातून ती रचनाकार्याच्या अर्थात कवीच्या मनाच्या अंतर्मनाचे दर्शन घडविते. 'हायकू' हा काव्य हा आत्मसंवाद करतानाच जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणारा साहित्य प्रकार आहे. मराठी साहित्याचा विचार करता आरती प्रभू, जी. ए. कुलकर्णी, कविवर्य ग्रेस यांनी खऱ्या अर्थाने वाङ्मयाला वाङ्मयरूप प्राप्त करून दिले. आरती प्रभू यांनी कोकणाच्या भूमीतून जीवनाकडे बघण्याची दृष्टी जागिवली, असे विवेचन केले. प्रास्ताविक डॉ. अमृता इंदूरकर यांनी तर सूत्रसंचालन प्रा. अमित दुर्योधन यांनी केले. प्रा. समीर कुमरे यांनी आभार मानले. या काव्यास्वाद व्याख्यानसत्राला विभागातील तसेच संशोधक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांना अभिवादन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रावबहादुर श्री. डी. लक्ष्मीनारायण यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात रावबहादुर श्री. डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली शताब्दी महोत्सव कक्षाचे विशेष कार्य अधिकारी श्री. प्रदीप बिनीवाले व सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री. गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते रावबहादुर श्री डी. लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, युडीसी शैलेश राठोड, कवडू भोयर, रुपेश आतराम, अनिल खरे, नरेंद्र पवार, आसिफ शेख, कार्तिक हरडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.





## पदव्युत्तर मानसशास्त्र विभागात आत्महत्या प्रतिबंध दिन
### मानसिक आरोग्य जागरूकता वाढविण्यावर भर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक मानसशास्त्र विभागात आत्महत्या प्रतिबंध दिन कार्यक्रम मंगळवार, दिनांक १० सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. यावेळी मानसिक आरोग्य विषयी जागरूकता वाढविण्याबाबत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेत आत्महत्या प्रतिबंधकतेच्या महत्त्वावर सर्जनशील पोस्टर प्रदर्शित केले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात विचारपूर्ण विचारांची देवाण-घेवाण केली. समाजातील मानसिक आरोग्य समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे निदर्शनास आले. विभाग प्रमुख डॉ. हिना खान यांनी या दिवशीच्या महत्वावर आपले विचार व्यक्त केले. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. हिना खान यांनी मानसिक आरोग्याच्या समस्यांशी झुंज देणाऱ्या व्यक्तींसाठी सुरक्षित आणि समर्थनात्मक वातावरण तयार करण्याचे महत्त्व सांगितले. शिक्षण आणि सामाजिक प्रबोधनाच्या माध्यमातून चांगले मानसिक आरोग्य टिकून राहते, असे त्या म्हणाल्या. विभागातील शिक्षक डॉ. बन्सोड, सीमा पगय, श्री अंजन महेश्वरी, रेणुका यांनी देखील कार्यक्रमादरम्यान आपले विचार व्यक्त केले. आत्महत्या प्रतिबंधासाठी जागरूकता आणि प्रारंभिक हस्तक्षेपाच्या महत्वावर त्यांनी प्रकाश टाकला. सहानुभूती, संवाद, आणि मानसिक आरोग्य संसाधनांची उपलब्धता यांचे महत्व देखील वक्त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन एमए सेम १ ची विद्यार्थिनी जिया आणि प्रणया यांनी कौशल्यपूर्वक केले. समारंभाच्या एक भाग म्हणून सहभागी व्यक्तींनी आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्य प्रचारात सक्रिय योगदान देण्याची शपथ घेतली. विभागाच्या या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. उपस्थितांनी मानसिक आरोग्य प्रचारात शिक्षण संस्थांची महत्त्वपूर्ण भूमिका मान्य केली. कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना जागरूकता पसरवण्यास आणि गरजू व्यक्तींना समर्थन देण्याच्या आवाहनासह झाला.




## पदव्युत्तर जनसंवाद विभागात करिअर समुपदेशन
### नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसोबत माजी विद्यार्थ्यांनी साधला संवाद

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागात गुरुवार, दिनांक १२ व शुक्रवार १३ सप्टेंबर २०२४ रोजी नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी करिअर समुपदेशन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी विद्यार्थी संवाद, इंडक्शन व ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक यांनी जनसंवाद क्षेत्रातील नवनवीन संधी बाबत माहिती दिली. प्रवेश घेतलेले बहुतांश विद्यार्थी जनसंवाद क्षेत्रात नवीन असल्याने अभ्यासक्रमाचे विविध पैलू आणि या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबद्दल त्यांनी माहिती दिली. शिक्षक, व्यावसायिक तज्ञ आणि माजी विद्यार्थ्यांशी तपशीलवार चर्चा करणे याबाबत महत्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे उद्घाटन पीटीआय नवी दिल्लीचे माजी वरिष्ठ संपादक व आयआयएमसी (अमरावती) चे माजी प्रादेशिक संचालक श्री विजय सातोकर यांच्या हस्ते १२ सप्टेंबरला पार पडले.

विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक तथा विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. विजय खंडाळ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पाहुण्यांमध्ये बीबीसी मराठीच्या रिपोर्टर भाग्यश्री राऊत, टीव्ही 9 चे विदर्भ ब्युरो चीफ श्री गजानन उमाटे, सोशल मीडिया प्रोफेशनल श्री शशांक गट्टेवार आणि पीआर प्रोफेशनल श्री अर्पण पठाणे यांचा समावेश होता. डॉ. खंडाळ यांनी विद्यार्थ्यांना जीवन आणि करिअर बद्दल अमूल्य टिप्स दिल्या. या कार्यक्रमात विभागाच्या वार्षिक अंक 'कॅम्पस'चे प्रकाशन करण्यात आले. करिअर समुपदेशन सत्रात, जनसंवाद व्यावसायिकांनी या क्षेत्रातील नवीन संधींची सद्यस्थिती मांडली. विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या उद्दिष्टांसाठी सर्वोत्तम तयारी कशी करावी याबद्दल माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी, विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक यांनी विद्यार्थ्यांना विभाग, अभ्यासक्रमाची आवश्यकता, विभागाचे नियमित उपक्रम आणि सुविधांबद्दल माहिती दिली. दुसऱ्या सत्रात विद्यार्थी आणि शिक्षकांनी आत्म-परिचय सादर केला. शेवटच्या सत्रात विभागातील सुमारे डझनभर माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव सध्याच्या विद्यार्थ्यांसोबत शेअर केले. संयोजक संघात प्रा. मनोज काळे, कार्यालयीन कर्मचारी प्रकाश तिमांडे, अंकित जगताप आणि प्रसाद फुलबांधे तसेच विद्यार्थी प्रतीक्षा वासनिक, प्रियांशू चौधरी, दीपक कुशवाह, कौस्तुभ चव्हाण, अनिकेत उमक, सतीश सहारे, खुशी राठोड, अमोल राठोड, पायाल काळे, श्रद्धा महाजन, तनिष्या गजभिये, विजया कुंड आणि तनु पाटील यांचा समावेश होता.



## विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे यांची जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठात केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती मंगळवार दिनांक १७ सप्टेंबर २०१४ रोजी साजरी करण्यात आली. माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली शैलेश राठोड यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, सर्वश्री योगेश केवटे, नितीन खरबडे, कवडू भोयर, अनिल खरे, रुपेश आतराम, नरेंद्र पवार, कार्तिक हरडे, आसिफ शेख, प्रदीप झोडे यांच्या सह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांना विद्यापीठात नोकरी १५ पैकी ११ प्रस्तावास मंजुरी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांना माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी नियुक्तीपत्र देण्यात आले. लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार गट- क व गट- ड मध्ये नियुक्ती देण्याबाबत विद्यापीठाने सादर केलेल्या १५ पैकी ११ प्रस्तावांना उच्च शिक्षण संचालनालयाने मान्यता दिली आहे.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या मान्यतेनंतर ११ उमेदवारांना विद्यापीठात रुजु करून घेण्याची कार्यवाही करण्यात आली. सेवेत रुजू करून घेताना संबंधित उमेदवाराकडे जातवैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्यामुळे ११ उमेदवारांपैकी १ उमेदवार कु. शिवानी सुरज कहाते यांचेकडे जातवैधता प्रमाणपत्र असल्याने त्यांना विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या शुभहस्ते निम्न श्रेणी लिपीक पदावरील नियुक्ती पत्र देऊन भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कुलगुरू कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजू हिवसे, विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक तथा वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कविश्वर, आस्थापना विभागातील सर्वश्री राकेश कोपुलवार, आनंद मेश्राम, श्री. संदिप थापा, श्री. स्वप्निल मोडक आणि लाड-पागे संघटनेचे पदाधिकारी श्री. सतिश सिरसवान, श्री. बंटी तुर्केल आदी उपस्थित होते.



# बौद्ध धर्माच्या मार्गाने जागतिक समुदायाचे गठन मिशिगन स्टेट विद्यापीठातील प्रा. जॉन क्यून यांचे प्रतिपादन

### विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान

बौद्ध धर्माच्या मार्गाने देशांतरित आंबेडकवादी जनसमुहाद्वारे जागतिक समुदायाचे गठन होत असल्याचे प्रतिपादन मिशिगन स्टेट विद्यापीठातील प्रा. जॉन क्यून यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी अतिथी व्याख्यान पार पडले. यावेळी प्रा. जॉन क्यून बोलत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना प्रा. क्यून यांनी आंबेडकरवादी प्रवासी संपूर्ण जगभरात विविध प्रकारे बौद्ध धर्माचा अभ्यास आणि आचरण करत समुदाय निर्माण करत असल्याचे सांगितले. युकेमधील दुसरी किंवा तिसरी पिढी असोत, यूएईमधील कामगार आणि व्यावसायिक असोत, किंवा अमेरिकेतील नव्या व्यावसायिकांची लाट यांच्या कडून जागतिक समुदायाचे गठन होत आहे. आंबेडकरवादी प्रवासी समूह जरी एक तुलनेने नवीन आणि उदयोन्मुख असला, तरी त्यांच्या जीवनाचा आणि ओळखीचा आधार बौद्ध धर्म नक्कीच आहे, असे ते म्हणाले. भारतात देखील बौद्ध ओळख ही प्रामुख्याने जातीय धर्मातून मुक्तता म्हणून पाहिली जाते. जी अमानवीय स्थिती म्हणून ते सहज ओळखू शकतात, जी परदेशात दिसून येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची बौद्ध धर्माची कल्पना त्यांच्या अनुयायांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रभावी राहिली आहे. भारतात जपानी, तैवानी, थाईलंड किंवा श्रीलंकन बौद्ध धर्माच्या माध्यमातून आलेल्या विविध पद्धती आणि प्रथांमध्ये ते अजूनही चर्चा करत आहेत. तथापि, जगभरातील आंबेडकरवाद्यांनी बौद्ध धर्माला जरी वेगवेगळ्या प्रकारे समजले असले, तरीही बौद्ध धर्म हा आंबेडकरवादी प्रवासी समुदायामध्ये एकमेव संलग्नता आणि ओळखीचा बिंदू राहतो, असे त्यांनी प्रामुख्याने सांगितले.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक-राजकीय चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी प्रेरित केलेल्या पिढ्यांना जीवनाकडे मुक्ततावादी दृष्टिकोन घेण्यास प्रोत्साहित केले, मग ती भारतात आणि परदेशात उच्च शिक्षण घेण्याची गोष्ट असो, राजकीय सहभाग असो किंवा सामाजिक उन्नती असो, याचा उद्देश प्रतिष्ठा आणि न्यायाकडे होता, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन तृतीय सत्रातील विद्यार्थिनी कु. सिमरन थुल यांनी केले तर आभार प्रथम सत्रातील विद्यार्थिनी कु.सिद्धी चाणे हिने मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.किशोर नैताम, डॉ. प्रमोद काणेकर, प्रा. प्राची वासनिक, प्रा. प्रियंका गावंडे, डॉ. अभिषेक चिमनकर, इशिका पिंपलकर व पंकज सोमकुवर यांनी केले.






# सांस्कृतिक स्पर्धांमधून विविध संस्कृतीची ओळख अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांचे प्रतिपादन

### आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी

सांस्कृतिक स्पर्धांमधून विविध संस्कृतीची ओळख होत असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणीस महाराज बाग चौक स्थित दीक्षांत सभागृहात गुरुवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२४ पासून सुरुवात झाली आहे. तीन दिवस चालणाऱ्या निवड चाचणीचे उद्घाटन करताना डॉ. कोरेटी मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे व विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांची उपस्थिती होती.







सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठे महत्व असल्याचे सांगत यातून स्मृती जपल्या जात असल्याचे डॉ. कोरेटी पुढे बोलताना म्हणाले. या स्पर्धांमध्ये भाग घेणे म्हणजे सांस्कृतिक मूल्यांची आठवण करणे होय. राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होता आल्याने तेथील संस्कृतीची ओळख तुम्हाला होईल. अशा कार्यक्रमांमुळे विविध भागातील संस्कार, संस्कृती विद्यार्थ्यांना कळत असल्याचे डॉ. कोरेटी म्हणाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला सांस्कृतिक स्पर्धांची मोठी परंपरा लाभली आहे. निवड चाचणीत उत्कृष्ट प्रदर्शन करीत विविध स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे नेतृत्व करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यशाचे शिखर गाठत देशाचे नेतृत्व करण्याची संधी अशा व्यासपीठांमधून मिळत असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी मार्गदर्शन करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे नाव राष्ट्रीय सेवा योजना तसेच सांस्कृतिक क्षेत्रात आदराने घेतले जात असल्याचे सांगितले. निवड चाचणी अत्यंत बारकाईने घेतली जात असून दोन्ही विभाग विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देत असल्याचे ते म्हणाले. इंद्रधनुष्य स्पर्धा अकोला येथे तर पश्चिम क्षेत्रिय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव गुजरात येथे होत आहे. या चाचणीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना या स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय यापूर्वी विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पुरस्कारांची माहिती त्यांनी दिली. प्रास्ताविक करताना विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. विजय खंडाळ यांनी उत्कृष्ट विद्यार्थ्यांची विविध स्पर्धांसाठी निवड केली जाणार असल्याचे सांगितले. सोबत सर्व सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. निवड चाचणीमध्ये एकूण ७७ महाविद्यालयातील ८१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तीन दिवस चालणाऱ्या निवड चाचणीमध्ये संगीत, नृत्य, नाटक, साहित्यिक आणि ललित कला अशा ५ विभागातून २६ कला प्रकाराकरिता विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन करीत आभार सांस्कृतिक समन्वयक श्री प्रकाश शुक्ला यांनी मानले.







## राज्यशास्त्र विभागात नवीन प्रवेशित विद्यार्थांचे स्वागत

आरंभ' ही नवीन सुरुवात म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम नुकताच पार पडला. माननीय कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांनी भूषवले.

विभाग प्रमुख डॉ. विकास जांभूळकर यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना जीवनातील नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी आणि नवीन कल्पना आणण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमादरम्यान विभाग प्रमुखांनी ८० वर्षांचा जुना विभागाचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर मांडला. राज्यशास्त्र विभाग विद्यार्थ्यांना तसेच विभागाला उंच शिखरावर घेऊन जाण्यासाठी विद्यार्थ्यांची भुमिका महत्वपूर्ण असल्याचे सांगितले. विभागाच्या सर्व आगामी कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी डॉ. विकास जांभूळकर यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आपले कलागुण दाखवले. यापुढे विद्यार्थ्यांना "ते जे करतात त्यावर मनापासून प्रेम करा" असा संदेश डॉ. विकास जांभूळकर विद्यार्थी व सर्व प्राध्यापकांना दिला. अनौपचारिक कार्यक्रम इतर शिक्षकांच्या उपस्थितीत आयोजित केला गेला. या कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्य व गायन सादर करून आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. आरंभ-२०२४ चे मिस्टर फ्रेशर तपिश गजभिये तर कु. शिवानी तुप्पट मिस फ्रेशर ठरली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तृतीय सत्राची विद्यार्थिनी सिमरन थुल यांनी केले. संचालन भाऊ राठोड व आरती घोटकर यांनी केले तर आभार वैशवी तेकाम हिने मानले. या कार्यक्रमाचा यशस्वीतेसाठी सांस्कृतिक कार्यक्रम संयोजक प्रा.किशोर नैताम, वैभव मेश्राम, संजना रघाटाते, सिध्दांत गायकवाड, अंजली मेश्राम, आशिष चौधरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रम प्रसंगी विभागांतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



डॉ. संजय ढोबळे



डॉ. संजीव मोहरील

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विषयातील गुरु-शिष्य २ टक्के संशोधकाच्या जागतिक यादीत
## डॉ. संजय ढोबळे यांचा सलग पाचव्यांदा २ टक्के यादीत समावेश

अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातील वैज्ञानिकांनी जगभरातील संशोधकांच्या स्कोपस डाटाबेसवरून माहिती घेऊन त्यांचे स्कोपस मधील सायटेशन, एच-इंडेक्स व प्रकाशित शोधनिबंधांची संख्या यावरून दोन टक्के जगभरातील वैज्ञानिकांची यादी नुकतीच प्रकाशित झाली आहे. भौतिकशास्त्र विषयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील गुरु-शिष्यांचे नाव २०२४ मध्ये प्रकाशित यादीत आले आहे. डॉ. संजय ढोबळे व डॉ. संजीव मोहरील अशी २ टक्के जागतिक संशोधकांच्या यादीत नाव असलेल्या वैज्ञानिकांची नावे आहेत.

डॉ. संजय जानराव ढोबळे यांनी आपली पीएचडी डॉ. संजीव मोहरील यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे. आज डॉ. संजय ढोबळे (शिष्य) व डॉ. संजीव मोहरील (गुरु) या दोघांचेही नाव जागतिक वैज्ञानिकांच्या दोन टक्के यादीत आले आहे. डॉ. संजय ढोबळे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भौतिकशास्त्राचे वरिष्ठ प्राध्यापक आहेत तर डॉ. संजीव मोहरील हे सेवानिवृत्त प्राध्यापक असून ते २०१४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहे. डॉ. ढोबळे व डॉ. मोहरील हे दोघेही ल्युमिनिसेन्स या विषयावर संशोधन करतात. यामध्ये प्रामुख्याने एलईडी, रेडिएशन, डासोमिट्री सारख्या विषयात त्यांचे प्रामुख्याने संशोधन आहे. डॉ. संजय ढोबळे संशोधन करीत असताना त्यांचे ९५१ शोधनिबंध स्कोपसवर प्रकाशित झाले आहेत, तर ७६ पेटेंट प्रकाशित करून एकूण त्यांच्या ४५ पेटेंटला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. त्यांची एकूण ३१ आंतरराष्ट्रीय स्तरावर पुस्तके प्रकाशित आहे. डॉ. ढोबळे यांनी एकूण ७८ विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी मार्गदर्शन केले आहे.

डॉ. ढोबळे यांचे नाव यापूर्वी सलग चौथ्यांदा दोन टक्के यादीत आलेले आहे. २०२०, २०२१, २०२२,२०२३ व आता २०२४ मध्ये पाचव्यांदा २ टक्के संशोधकांच्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट झाले आहे. त्यांचे नाव २०२४ मध्ये स्कॉलर जीपीएस या नामांकित ०.०५ टक्के यादीमध्ये जागतिक स्तरावर आलेले आहे. यादीमध्ये ल्युमिनिसेन्स मध्ये काम करणाऱ्या एकूण १७ वैज्ञानिकांची नावे आहेत. यामध्ये डॉ. ढोबळे भारतातील एकमेव वैज्ञानिक म्हणून त्यांचे नाव आहे हे विशेष.

डॉ. संजीव मोहरील यांचे जागतिक स्तरावर २०२४ मध्ये नाव आले आहे व त्यांचे स्कोपसवर ४२८ शोधनिबंध प्रकाशित आहे. त्यांनी एकूण ३६ विद्यार्थ्यांना पीएचडीसाठी मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये एक डॉ. संजय ढोबळे आहे हे विशेष. गुरु-शिष्य एकाच वर्षी यादीत आल्यामुळे दोघांनी विशेष आनंद व्यक्त केला आहे. जागतिक स्तरावरील २ टक्के वैज्ञानिकांच्या यादीमध्ये नाव समाविष्ट झाल्याने विद्यापीठाचे माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी अभिनंदन केले आहे.

## 'रश्मीरथी' खंडकाव्यातून उलगडला नरभूषण 'कर्ण'
### एक दिवसीय राष्ट्रीय नाट्य महोत्सव अंतर्गत प्रस्तुती
### विद्यापीठाच्या ललित कला विभागाचे आयोजन



राष्ट्रकवी श्री रामधारी सिंह 'दिनकर' रचित 'रश्मीरथी' या खंडकाव्यातून नरभूषण कर्ण यांच्या महाभारतातील वर्ण संघर्षाची कहाणी वर्णन करण्यात आली. राष्ट्रकवी श्री रामधारी सिंह 'दिनकर' यांच्या पन्नासाव्या पुण्यस्मृती वर्षाच्या अनुषंगाने एक दिवसीय राष्ट्रीय नाट्य महोत्सव अंतर्गत सुरभी बेगूसराय निर्मित 'रश्मीरथी' या नाटकाचे आयोजन बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ललित कला विभाग व छंद मंदिर यांच्या वतीने गुरुनानक भवन येथे हा नाटकाचा प्रयोग पार पडला.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी ललित कला विभाग व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, आयक्यूएसी संचालक डॉ. स्मिता आचार्य, अजय पाटील यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. रश्मीरथी या नाटकात अभिनेता-निर्देशक हरीश हरीऔध (एनएसडी) यांनी अभिनय तर प्राक्कथन जयंत गाडेकर (एनएसडी) यांनी केले. या नाटकाचे आयोजन ललित कला विभाग व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात यांनी केले. या नाटकाला मुद्रित करीत व प्रकाश व्यवस्था लेखक फिल्मकार आशिष कुलकर्णी यांनी सांभाळली. संगीत विष्णू देवदास यांनी दिले.

देशाला नुकतेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१-५२ मध्ये 'रश्मीरथी' ही रचना प्रकाशित करण्यात आली. कवी दिनकर तत्कालीन राजकीय, सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणारे व्यक्तिमत्व होते. देशाच्या स्वातंत्र्यानंतर नवीन लोकतंत्र आपण बनवत होतो. लोकतंत्र शिशु अवस्थेत असताना समाजाला संदेश देणे महत्त्वाचे होते. कोणतीही गंभीर गोष्ट सांगायची असेल किंवा एकतेचा भाव जागवायचा असेल तर पुस्तकातून तो सांगणे कठीण होता. त्यामुळे कवी दिनकर यांनी मनोरंजनाच्या माध्यमातून महाभारतातील कर्णाचे उदाहरण घेत तत्कालीन सामाजिक वर्णव्यवस्थेवर 'रश्मीरथी'च्या माध्यमातून प्रहार केला. रश्मीरथी हे ११३ पानांची कविता असून त्याला खंडकाव्य देखील म्हटले जाते. अशाप्रकारचे खंड काव्य नाटकाच्या रूपामध्ये प्रथमच सादर करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संचालन विजय कथे यांनी केले तर आभार हर्षद सालपे यांनी मानले. कार्यक्रमाला उपस्थितांमध्ये अधिसभा सदस्य डॉ. किशोर इंगळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व कलारसिक प्रेक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारणी सभेच्या माध्यमातून केलेले कार्य ऐतिहासिक
## यशवंत महाविद्यालय वर्धा येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. मधुकर कासारे यांचे प्रतिपादन
## बहिष्कृत हितकारिणी सभेला १०० वर्षे पूर्ण झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन विभागात परिषद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून केलेले कार्य ऐतिहासिक असल्याचे प्रतिपादन यशवंत महाविद्यालय वर्धा येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. मधुकर कासारे यांनी केले. २० जुलै १९२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. त्याला २० जुलै २०२४ रोजी १०० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व विचारधारा विभागात एक दिवसीय परिषदेचे आयोजन शनिवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले. यावेळी परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. कासारे मार्गदर्शन करीत होते.




माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. अविनाश फुलझेले यांनी भूषविले तर व्याख्याते म्हणून यशवंत महाविद्यालय वर्धा येथील अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. मधुकर कासारे यांची उपस्थिती होती. कामांची मोठी जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे होती. पण ते घाबरले नाहीत किंवा डगमगले नाहीत, उलट तुम्ही माझ्यावर कितीही टीका केली तरी माझ्या समाजाला वाचवल्याशिवाय मी एक इंचही मागे हटणार नाही, असे वचन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले होते. यावर ते खरे उतरले हे काळाने सिद्ध केले आहे. म्हणूनच बहिष्कृत हितकारिणी सभेला आज १०० वर्षे झाली असली तरी तिच्या कार्याचे महत्त्व अबाधित आहे, असे पुढे बोलताना डॉ. कासारे म्हणाले. बहिष्कृत हितकारिणी सभा ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली सामाजिक संस्था होती. यातून त्यांनी शिकवा, चेतवा आणि संघर्ष करा, असे आवाहन केले, असे डॉ. कासारे म्हणाले. समाजाचा उद्धार कसा होईल. याचा विचार केला. त्यांनी शिक्षणावर भर दिला आणि त्याचा प्रचार केला.

त्यांनीच महाराष्ट्रात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. वाचनालयाची सुरुवात त्यांनीच केली. हे त्यावेळी आवश्यक होते, अन्यथा अस्पृश्य वर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरण कधीच मिळाले नसते. त्यांनी शिक्षणाप्रती जनजागृती केली. औद्योगिक व कृषी शाळा सुरू करण्याचे श्रेयही त्यांना जाते. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून त्यांनी सर चिमणलाल सेटवाल, डॉ. परांजपे, बी.जी. खेर यांच्यासारखे प्रसिद्ध लोकांना जोडले. इतर वृत्तपत्रांनी दलितांच्या प्रश्नांना स्थान दिले नाही म्हणून त्यांनी समाजापर्यंत संदेश देण्यासाठी बहिष्कृत भारत साप्ताहिक सुरू केले, असे डॉ. कासारे म्हणाले. दामोदर हॉलपासून सुरू झालेली चिंतन प्रक्रिया सातत्याने १९५६ पर्यंत चालू होती. त्यांच्या सर्व कार्यकृतीचे महत्त्व आजही कायम असल्याचे डॉ. कासारे म्हणाले.

अध्यक्षीय भाषण करताना डॉ. अविनाश फुलझेले यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा ही चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे एक माध्यम होते, असे सांगितले. या सभेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले विचार मांडले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक मान्यता मिळाली, असे डॉ. फुलझेले म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन किरण उमरे यांनी केले तर आभार दिलीपकुमार लेहगावकर यांनी मानले.

## राज्यघटनेने विषमता नष्ट केली : गोडघाटे

उद्‌घाटन सत्रानंतर चार स्वतंत्र चर्चा सत्रे झाली. पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. अशोक गोडघाटे म्हणाले की, भारतातील गुलामगिरीचे मूळ धार्मिक व्यवस्थेत असल्याचे दिसते. राज्यघटनेने विषमता नष्ट करून मानवी मूल्ये दिली. संविधानाच्या निर्मात्यांनी हे मानवाधिकार देण्याचे काम संविधानाच्या माध्यमातून केले. सत्राचे संचालन अशोक जामगडे यांनी केले तर आभार रमेश गजभिये यांनी मानले. दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार मिलिंद कीर्ती तर तिसऱ्या व चौथ्या सत्रात डॉ. संजय शेंडे व डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांनी मार्गदर्शन केले.







## राज्य- समाज सशक्त तर देश शक्तिशाली

### एनएडीटीचे सहसंचालक डॉ. धनंजय वंजारी यांचे प्रतिपादन
### पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात एक दिवसीय परिसंवाद

राज्य व समाज सशक्त तर देश शक्तिशाली असतो, असे प्रतिपादन नागपूर येथील एनएडीटीचे सहसंचालक डॉ. धनंजय वंजारी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागात 'इंडिया @ ७५: अ रिव्ह्यू' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद शनिवार, दिनांक २१ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. या परिसंवादाचे आयोजन पॉलिटिकल सायन्स रिसर्च फोरमने केले होते. परिसंवादात या विषयावर बोलताना डॉ. वंजारी मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसंवादाचे अध्यक्षस्थान राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले. व्याख्याते म्हणून एनएडीटी नागपूरचे सहसंचालक डॉ. धनंजय वंजारी (आयआरएस), प्रमुख अतिथी म्हणून मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. भारताचे पुनरावलोकन करताना स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरचा देश असा कालखंड निश्चित करावा लागेल, असे पुढे बोलताना डॉ. वंजारी यांनी सांगितले. विविध धर्म, भाषा, प्रांतातील लोकांना एकत्रित आणून भारताने सार्वभौम लोकशाहीचा नवीन प्रयोग स्वातंत्र्यानंतर केला आहे. सोबतच सार्वभौम लोकशाहीचा स्वीकार करताना ७५ वर्षांपूर्वी भारताने भविष्यकालीन ध्येय निश्चित केले असेल. संविधानाच्या प्रास्ताविकेतच या ध्येयांची माहिती देण्यात आली आहे. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडाचे पुनरावलोकन करताना संबंधित सर्व घटकांचा अभ्यास करावा लागेल. यामध्ये समाज, शासन म्हणजेच राज्य, प्रशासन, विविध धर्म, संस्कृती यांचा समावेश आहे. राज्य म्हणजेच संपूर्ण राजकीय व्यवस्था, कार्यपालिका, न्यायपालिका तर समाज म्हणजे सर्व जाती धर्मांचे समूह होय. संशोधकांना विशेष करून समाज आणि राज्य या दोन महत्त्वपूर्ण घटकांवर लक्ष केंद्रित करावे लागेल, असे डॉ. वंजारी म्हणाले. देशाची राजकीय कार्यपालिका श्रेष्ठ असली तरी

त्यावर नियंत्रण ठेवणारी सामाजिक व्यवस्था देखील तेवढीच सशक्त असावी असे डॉ. वंजारी म्हणाले. समाजाला मजबूत करण्यात सक्षम असलेले देश विकासाच्या दृष्टीने यशस्वी झाले आहे. 'न्यॅरो कॉरिडोर' या पुस्तकात देश किती व समाज किती मजबूत असावा याबाबत वर्णन आहे. मात्र, यामध्ये पाश्चिमात्य देशांचा अभ्यास करण्यात आला आहे. या पुस्तकाचे सूत्र विविधता असलेल्या भारत देशाला लागू होत नाही. त्यामुळे देश व समाजाचा अभ्यास करताना तिसरी दिशा देणे गरजेचे आहे. विविधता जोडल्याशिवाय भारत देशाचे पुनरावलोकन करणे शक्य नाही. कोणत्या समस्यांना घेऊन पुढे यावे लागेल याकरिता सामूहिक समस्यांची यादी तयार करावी लागेल, असे डॉ. वंजारी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी मार्गदर्शन करताना भारत काय आहे? हे संविधानाचा प्रास्ताविकेतून दिसून येत असल्याचे सांगितले. संविधानाच्या प्रस्तावनेत करण्यात आलेल्या भारताच्या कल्पनेबाबत चिंतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. जगात मोठी लोकशाही असलेला भारत हा एकमेव देश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. परिसंवादाचे संचालन डॉ. प्रमोद कानेकर यांनी केले तर आभार प्रा किशोर नैताम यांनी मानले.

## विद्यार्थ्यांकडून संशोधन पेपर सादर

राज्यशास्त्र विभागात आयोजित एक दिवसीय परिसंवाद कार्यक्रमात विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी संशोधन पेपर सादर केले. डॉ. जितेंद्र वासनिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात डॉ. सुनील अखंडे, प्रा. प्रियंका गावडे, प्रा. किशोर पाटील, प्रा. प्रज्ञानंद मते, सिमरन थूल यांनी संशोधन पेपर सादर केले. डॉ. शैलेंद्र लेंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात प्रा. किशोर नैताम, प्रा.प्राची वासनिक, डॉ. भूपेंद्र घरत, प्रा. सचिन चापके, बरसा घोष, वैभव मेश्राम यांनी तर डॉ. सुप्रिया डविड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्रात डॉ. प्रमोद केणेकर, डॉ. अतुल मून, प्रा. सुशील मंडल, डॉ. अभिषेक चिमणकर, आर. भास्कर राव, संजना रघाटाटे यांनी संशोधन पेपर सादर केले.

## स्पर्धेत टिकायचे असेल तर स्वतःला सिद्ध करा

### प्रा. स्वप्निल कांबळे यांचे प्रतिपादन

### स्नातकोत्तर इतिहास विभागात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन




आधुनिक संसाधनांच्या वापरातून ज्ञानात भर घालत आजच्या स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी स्वतःला सिद्ध करा, असे आवाहन प्रा. स्वप्निल कांबळे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर इतिहास विभागात शनिवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रा. कांबळे मार्गदर्शन करीत होते.

माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी भूषविले. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना प्रा. कांबळे यांनी योजनाबद्ध नियोजन, कठोर मेहनत करण्याची तयारी आणि योग्य क्रमिक पुस्तकांचे वाचन केल्यानेच कोणत्याही परीक्षेत यश मिळेल असा कानमंत्र दिला. काल सारखे आज जगता येणार नाही. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी रोज स्वतःमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. इतिहास विषयात नेट-सेटची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी अत्यंत मौलिक मार्गदर्शन केले. नेट-सेट परीक्षेच्या पहिल्या पेपरबाबत विद्यार्थ्यांच्या मनात फार भीती असते. त्या पेपरची तयारी योग्य पुस्तकांचे वाचन आणि नियोजनबद्ध तयारीद्वारे करता येते. या परीक्षेमध्ये विचारल्या जाणाऱ्या गणितांच्या प्रश्नाबाबत प्रा. कांबळे यांनी अगदी

सोप्या क्लुप्त्या वापरून ही परीक्षा पास करता येते, असे समजावून सांगितले. याशिवाय रोज एका वर्तमानपत्राचे नियमित वाचन करावे. इतिहास विषयाची नेट आणि सेटची परीक्षा पास करण्याकरिता एमए प्रथम आणि एमए द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम समजून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संदर्भित पुस्तकांमधून शॉर्ट नोट्स काढून त्याचे वारंवार वाचन करणे योग्य राहील, असे ते म्हणाले. याशिवाय नेट-सेट परीक्षेच्या बदललेल्या स्वरूपाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पहिला पेपर सामान्य ज्ञान आणि दुसरा विषयाचा पेपर यामध्ये परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता किती गुण मिळवायला पाहिजे याचे सविस्तर विवेचन केले. नेट, सेटच्या परीक्षेत नकारात्मक गुणदान नसल्यामुळे विद्यार्थ्यांना लाभदायक आहे, असे सांगितले. अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. कोरेटी यांनी परीक्षेच्या बदललेल्या स्वरूपाविषयी माहिती दिली. येणाऱ्या काळात या परीक्षेचे वस्तुनिष्ठ स्वरूप जाऊन वर्णनात्मक पद्धत येऊ शकते. तसेच नेट, सेटच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन आणि दर्जेदार पुस्तके मिळाली तर ही परीक्षा उत्तीर्ण करणे कठीण जाणार नाही, असे मत व्यक्त केले. व्याख्यान सत्र कार्यक्रमाचे संचालन प्रा. विठ्ठल पारखी यांनी केले तर आभार डॉ. नेहा अफरीन यांनी मानले.

## शिवकालीन काळात स्त्री-पुरुष समानता
### पोलीस निरीक्षक श्री विनायक गोल्हे यांचे प्रतिपादन
### गृहविज्ञान विभागात लैंगिक समानता आणि संवेदनशीलता जागरूकता कार्यक्रम





छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात स्त्री-पुरुष समानता आणि संवेदनशीलतेचा समन्वय दिसून येत होता, असे प्रतिपादन अंबाझरीचे पोलीस निरीक्षक श्री विनायक गोल्हे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर गृहविज्ञान विभागात लैंगिक समानता आणि संवेदनशीलता जागरूकता कार्यक्रम मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून श्री. गोल्हे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे, अंबाझरी ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. विनायक गोल्हे, विद्यापीठ कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्ष डॉ. शालिनी लिहितकर, पदव्युत्तर गृहविज्ञान प्रमुख डॉ. वंदना धवड, समाजसेविका श्रीमती माधुरी साकुलकर, श्रीमती शितल हारोडे, श्रीमती ज्योती कोकणी, कु. दिपाली मानकर यांची उपस्थिती होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने विद्यापीठ गीत म्हणून स्वीकारलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'या भारतात बंधुभाव नित्य वसु दे...' या भजनातच समानतेचे भाव दिसून येते, असे गोल्हे पुढे बोलताना म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी युद्धाच्या वेळी एका महिलेला कैद करून आणले. त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या महिलेला ससन्मान घरी पोहोचण्याची व्यवस्था करीत 'आमच्या आई जर आपणा इतक्या सुंदर असत्या तर आम्ही देखील तेवढेच सुंदर असतो, असे शिवाजी महाराज त्या महिलेला म्हणाले होते. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मध्ये स्त्री-पुरुष समानतेची भावना निर्माण करणारी शिकवण दिली होती. समाजामध्ये आज आईने मुलांना अशाच प्रकारे समानतेची शिकवण देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आपली पुरुषप्रधान संस्कृती होती. मात्र, आता काळ बदलला आहे. महिलांच्या बाबतीत प्रत्येक क्षेत्रात समानता निर्माण होत आहे. महिलांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक क्षमता आहे. समाजाचा एक घटक म्हणून आपणास समाजाचे देणे लागते. त्यामुळे संवेदनशीलता महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी पोक्सो कायद्याबाबत देखील माहिती दिली. पोलीस दीदी, पोलीस काका तसेच पोलीस विभागातील विविध उपक्रमाबाबत माहिती दिली. मोबाईलचा वापर कितीपत करावा तसेच त्यापासून जागृत राहण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक गोल्हे यांनी केले.

अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी स्त्री-पुरुष समानता घरापासूनच निर्माण करण्याची सुरुवात करण्याचे आवाहन केले. भारतीय संस्कृती पूर्वी मातृसत्ताक होती. काळाच्या ओघात ती पितृसत्ताक होत गेली. मात्र, आदिवासी समाजामध्ये आजही मातृसत्ताक पद्धती दिसून येत असल्याचे ते म्हणाले. महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाही. महिलांना कमी लेखण्याची मानसिकता दूर केली पाहिजे, असे डॉ. दुधे म्हणाले. कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या अध्यक्ष डॉ. शालिनी लिहितकर यांनी मार्गदर्शन करताना समाजामध्ये स्त्री- पुरुष समानता प्रस्थापित करण्याची गरज व्यक्त केली. कार्यस्थळी तसेच शाळा, महाविद्यालयांमध्ये सुरक्षितता वाढविण्यावर त्यांनी भर दिला.

लैंगिक समानता व संवेदनशीलता निर्माण करण्यात माध्यमांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्या म्हणाल्या. सोबतच विद्यापीठात कार्यरत असलेल्या कार्यस्थळी लैंगिक शोषण व लिंगभेद अत्याचार विरोधी संरक्षण समितीच्या कार्याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. समिती सदस्य श्रीमती माधुरी साकुलकर यांनी मार्गदर्शन करताना स्त्री- पुरुष हा भेद नैसर्गिक नव्हे तर समाजाने निर्माण केलेला असल्याचे सांगितले. महिला व पुरुष या दोघांचीही समाज आणि राष्ट्रांमध्ये समान भूमिका असल्याचे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. वंदना धवड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभदा जांभुळकर यांनी केले तर आभार दिपाली मानकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील डॉ. प्राजक्ता नांदे, श्रीमती मीनाक्षी सुरपांडे, डॉ. तुलिका खरे, श्री. याकुब शेख, श्री दिलीप लंगडे यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला शैक्षणिक परिसरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.










## लोकशाही विकासावर अवलंबून - डॉ. रूमकी बसू

### लोकप्रशासन विभागाच्या हिरक महोत्सव निमित्त राष्ट्रीय परिषद




देशातील लोकशाही ही प्रामुख्याने विकासावर अवलंबून आहे. लोकशाहीत तटस्थता असणे आवश्यक असून सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्थेला प्राधान्य असावे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील सार्वजनिक धोरण आणि सामाजिक विज्ञान सरकारी संस्था केंद्राच्या प्रमुख डॉ. रूमकी बसू यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या लोकप्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था विभागाच्या हीरक महोत्सवानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद कॅम्पसमधील डॉ. ए. के. डोरले सभागृहात शुक्रवार, दिनांक २७ व शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडली. यावेळी बीजभाषण करताना डॉ. बसू मार्गदर्शन करीत होत्या.

राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून दिल्ली येथील भारतीय लोकप्रशासन संस्थेचे डॉ. सुरेश मिश्रा, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. ई. वायूनंदन, दिल्ली येथील सार्वजनिक धोरण आणि सामाजिक विज्ञान सरकारी संस्था केंद्राच्या प्रमुख डॉ. रूमकी बसू, विद्यापीठ लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. बसू यांनी लोकशाहीकडून वास्तविक लोकशाहीकडे होत असलेल्या प्रक्रियेचे वर्णन केले. डॉ. सुरेश मिश्रा यांनी भाषणातून लोकप्रशासनाच्या शिक्षणात आणि संशोधनात संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या भूमिकेवर चर्चा करताना त्यांनी संस्थेच्या योगदानाचा उल्लेख केला. संस्थेला आवश्यक अनुदानाचे फक्त ४० टक्के मिळत असूनही, संस्थेचे संस्थापक पंडित जवाहरलाल नेहरू यांचा वारसा संस्थेत कायम आहे, असे त्यांनी सांगितले. माजी कुलगुरू प्रा. ई. वायूनंदन यांनी नवे शिक्षण धोरण विद्यार्थी हिताचे असल्याचे सांगत यामुळे विद्यार्थी त्यांच्या कुवतीप्रमाणे विषय निवडू शकतील, असे सांगितले. विभागाच्या योगदानाबद्दल कौतुक केले आणि महाराष्ट्रातील आपणास आलेल्या अनुभवाची माहिती दिली. आयुष्यात प्रॅक्टिकल राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांनी त्यानंतर विभागाचा इतिहास सांगितला. विभागाचे संस्थापक प्रा. एम. पी. शर्मा यांचा उल्लेख केला आणि या विभागाची आशियातील पहिली अशी ओळख कशी निर्माण झाली याचे वर्णन केले. त्यांनी विभागाच्या इतर महत्त्वपूर्ण प्रमुखांपैकी व्ही. एस. मूर्ती, एस. एल. दवे, नीलिमा देशमुख आणि डॉ. निर्मलकुमार सिंह यांचे विभागाच्या उभारणीत मोलाचे योगदान आहे असे सांगितले.यावेळी विभागाचा ७५ वर्षांचा प्रवास उलगडणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. विभागाच्या सहायक प्राध्यापक डॉ. सुप्रिया डेव्हिड यांनी प्रास्ताविक केले. संशोधक विद्यार्थिनी व इतर प्रतिनीधींचे मेघना मंडल यांनी आभार मानले. आयोजनात डॉ. धर्मेंद्र तुरकर, प्रा. रमण शिवणकर, प्रा. अंकुश मराठे, प्रा. श्रीवर्धन केकतपुरे, जुही मिश्रा, लिंटा टॉमसन यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.





## आरोग्य हीच संपत्ती - प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे
### विद्यापीठ आरोग्य केंद्रात आरोग्य तपासणी

आरोग्य हीच संपत्ती असून तिला जोपासणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. सामान्य आरोग्य तपासणी, दंत तपासणी, डोळ्यांची तपासणी, नाक- कान- घसा तपासणी, फिजिओथेरपी, रक्त तपासणी शिबिराचे आयोजन मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रवी नगर येथील डी. लक्ष्मीनारायण परिसरातील आरोग्य केंद्रात पार पडलेल्या शिबिराचे उद्‌घाटन करताना डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते तर यावेळी महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुवर यांची उपस्थिती होती. शारीरिक व मानसिक स्थितीवर उत्तम आरोग्य अवलंबून असल्याचे डॉ. दुधे पुढे बोलताना म्हणाले. आपण कार्यानि कितीही मोठे असलो आणि आरोग्य कमकुवत असेल तर यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे उत्तम आरोग्य जोपासण्याचे आवाहन डॉ. दुधे यांनी केले. यावेळी महिला वैद्यकीय अधिकारी डॉ. सरोज शामकुमार यांनी प्रास्ताविक करताना पूर्वी आपण आरोग्य शिबिराकरिता एक-एक तज्ञांना बोलावीत होतो. या शिबिराकरिता सर्व तज्ञांना एकत्रित बोलाविण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य तपासणी शिबिरामध्ये दंत चिकित्सक डॉ. पल्लवी भगत, कान नाक-घसा-तज्ञ डॉ. आरुषी बक्षी, डॉ. प्रतीक्षा जपझापे, पॅथॉलॉजिस्ट डॉ. सागर गवई, समाजसेवक डॉ. संदीप महाकाळकर, फिजीओथेरपीस्ट डॉ. प्रेरणा काळे, डॉ. मानसी अग्रवाल, डॉ. विभूती गौर, डॉ. शिवानी बेलखोडे, न्यूरो फिजिओथेरपी डॉ. पुष्पा धोटे, डॉ. शलाका धनकर, दंत चिकित्सक डॉ. ललित गहाणे, नेत्रतज्ञ डॉ. पराग ठाकरे आदी डॉक्टरांच्या चमूने आरोग्य शिबिरास सहकार्य केले. आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्याकरिता विद्यापीठ आरोग्य केंद्रातील मनीष ठाकरे, प्रकाश भुशीकर, प्रकाश वानखेडे, निलेश कनेर, शैलेश इरपाची यांनी परिश्रम घेतले.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात माननीय प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव श्री गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. यावेळी सर्वश्री जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, युडीसी शैलेश राठोड, मनोज मोरे, नितीन खरबडे, योगेश केवटे, रुपेश आतराम, संदीप थापा, अनिल खरे, नरेंद्र पवार, आसिफ शेख, प्रदीप झोडे, कार्तिक हरडे यांच्यासह अन्य उपस्थित होते



## स्नातकोत्तर इतिहास विभागात एमए प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर इतिहास विभागात एमए प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. एमए प्रथम वर्षाच्या नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करणे इतिहास विभागाची दीर्घ परंपरा राहिलेली आहे.सीनियर विद्यार्थ्यांकडून प्रवेशित नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत होत असते.

नवीन विद्यार्थ्यांना विभागातील वातावरणाशी सहजरीत्या जुळले जावे. सीनियर विद्यार्थ्यांशी त्यांची व्यवस्थित ओळख व्हावी आणि त्यातून त्यांच्याशी योग्य समन्वय निर्माण व्हावा या उद्देशाने स्वागताचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो, असे मत मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. शामराव कोरेटी यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन करताना व्यक्त केले. प्रवेशित विद्यार्थ्यांनी विभागात नियमित यावे आणि वर्षभरात होणाऱ्या विविध कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. विभागातील डॉ. लक्ष्मण गोरे, डॉ. राकेश कोरेकर, डॉ. प्रदीप चौहान यांनीही विद्यार्थ्यांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. यानंतर सीनियर विद्यार्थ्यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता मनोरंजनात्मक विविध स्पर्धांचे आयोजन केले. प्रवेशित विद्यार्थ्यांनी सुद्धा त्यांना योग्य प्रतिसाद दिला. नृत्य, गाणी सादर करून कार्यक्रमात एक वेगळी रंगत निर्माण केली. मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धांमधून मिस्टर फ्रेशर म्हणून एमए प्रथम वर्षाचा विद्यार्थी वेदांत चट्टे याची निवड करण्यात आली. मिस फ्रेशर म्हणून कु. दामिनी सहारकर हिची निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विवेक ठाकरे यांनी केले. संचालन यश बलवीर यांनी केले तर आभार अनुराग गायकवाड यांनी मानले.



## प्रवास व पर्यटन विभागात जागतिक पर्यटन दिन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागात जागतिक पर्यटन दिवसाचे आयोजन शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले. २७ सप्टेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्र विश्व पर्यटन संघटनेद्वारे १९८० पासून त्यांचा स्थापना दिवस दरवर्षी जागतिक पर्यटन दिवस म्हणून साजरा केल्या जातो. या मागचा मुख्य उद्देश पर्यटनाला वाव मिळावी व त्यातून जागतिक शांतता प्रस्थापित होऊन जागतिक आर्थिक बळ वाढावे हा आहे.

विश्व पर्यटन दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा प्रवास व पर्यटन विभाग दरवर्षी कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. संयुक्त राष्ट्र विश्व पर्यटन संघटनेने दिलेल्या विषयावर विद्यार्थी शोध प्रबंध सादर करीत असतात. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी श्री हरीश पालीवाल उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या संबोधनात भारतीय पर्यटन स्थळांच्या विकास बाबत प्रयत्न करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले भारतीयांनी बाहेर देशातील स्थळांना भेटी देण्या पेक्षा भारतीय पर्यटन स्थळांना भेट देऊन येथील पैसा येथेच गुंतवून भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात भर द्यावा. विशेष अतिथी म्हणून प्रवास व पर्यटन विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. प्रदीप मेश्राम हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून माणूस हा पूर्णतः प्रवासी आहे. पुरातत्व हा विषय मनुष्याच्या आनुवंशिक आणि पर्यावरणीय प्रवासाशी निगडित आहे. तसेच प्रवासाचे महत्व सांगताना ते म्हणाले यात्रा केल्याने वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ ठीक राहते.विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आजवर झालेल्या अतिथी व्याख्यानाचा आणि विभागातर्फे घेण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या पर्वात विद्यार्थ्यांनी पर्यटन आणि शांतता या विषयावर आपले शोध प्रबंध सादर केले. या पर्वाचे मुख्य अतिथी वसंतराव नाईक महाविद्यालयातील पुरातत्व विभागाचे प्रमुख डॉ. आशिष शेंडे हे होते. त्यांनी आपल्या वक्तव्यामध्ये प्राचीन स्मारकांचे संरक्षण व्हावे व ते करताना प्रवास व्यवस्थापकाच्या साहाय्याने स्मारकाचे विद्रुपीकरण होऊ नये या करिता प्रवास व पर्यटन विषयाच्या विद्यार्थ्यांनी कार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता डॉ. अरविंद उपासनी, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुरडकर, प्रा मनोज वाहने तसेच पदवी भाग एक आणि दोनचे विद्यार्थ्यांनी योगदान दिले.

TheHitavada

Nagpur City Line | 2024-09-02 | Page- 3
ehitavada.com

# 'If you want to know Gandhi, go back to Gandhi'

■ Staff Reporter

"IF YOU want to know Gandhi, go back to Gandhi. And before going back to Gandhi, read Gandhian scholars," said Prof S B Singh at book review session of Narayan Desai's book 'My Gandhi'. The book review and interactive session was organised by alumni association of post graduate department of Gandhian thought of Rashtrasanta Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) at Auditorium of the department at Gandhi Nagar Square.

The book 'My Gandhi' is authored by Narayan Desai and was published in year 1999. Desai was son of Madhavbhai Desai who worked as Principal Secretary for Mahatma Gandhi for 15 years. He spent almost 24 years at Sabarmati and Sewagram Ashrams of Gandhiji.

Describing the book, Prof S B Singh, former Vice-Principal, VMV Junior College, said, the book can not be categorised as Autobiography, Autography, Memoir, or Chronical but a combination of all. The book is impressionist writing of Mahatma Gandhi on part of Narayan Desai, he added.

Nrupendra Modi, former Professor, Mahatma Gandhi Antarrashtriya Hindi Vishwa Vidyalaya, Wardha, presided over the programme.

Pramod Watkar, Head, Department of Gandhian Thought; and Dr Prashant Kadu, Dean, Faculty of Interdisciplinary Studies, RTMNU were present for the programme along with students and alumni of department of Gandhian thoughts.

Ravi Gudhade anchored the programme.



Nrupendra
by Anil Futane)

# भाषा बोध ही है लेखन कला की आधारशिला : श्रीपाद जोशी

दबंग स्वर

...र। भाषा बोध ही लेखन कला की शक्ति और ...रशिला है। भाषा ही ज्ञान का माध्यम है। मीडिया ...न के लिए समाज, संस्कृति और भाषा का गहन बोध ... चाहिए। यह बात प्रसिद्ध साहित्यकार और अखिल ...य मराठी महामंडल के पूर्व अध्यक्ष श्रीपाद जोशी ने ...। वे हिन्दी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ...र विश्वविद्यालय द्वारा आयोजित 'मीडिया लेखन ...शाला' के समापन सत्र में बोल रहे थे। उन्होंने कहा ...षा के शिक्षण-प्रशिक्षण पर गंभीरता से विचार करने ...आवश्यकता है। भाषा का संस्कार ही हमारे व्यक्तित्व ...नियामक होता है। इस अवसर पर पावर ऑफ वन ...सक) के सम्पादक नीरज श्रीवास्तव ने कहा कि ज्ञान ... का सबसे बड़ा हथियार है। ज्ञान के बल पर व्यक्ति ...नौती पर विजय प्राप्त कर सकता। इसलिए मनुष्य को ...र्जन के लिए सतत प्रयत्नशील रहना चाहिए। कार्यक्रम ...अध्यक्षता करते हुए हिन्दी विभागाध्यक्ष डॉ. मनोज ...य ने कहा कि भाषा मनुष्य को संस्कारित करती है। ...षी कौशल हमारी वैचारिक समझ को विकसित करता है। माध्यम लेखन में भाषा की भूमिका को हमें ईमानदारी से समझने की जरूरत है। कार्यशाला के दूसरे दिन तरुण भारत के सहयोगी ... स्तम्भ लेखन के विविध आया... विभाग के राजभाषा अधिकारी ... तथा विज्ञापन लेखन कला पर ... किया। संचालन डॉ. सुमित सिं... प्रा. जागृति सिंह ने किया। सभी ... के हाथों प्रमाण-पत्र प्रदान किया...



भाषा बोध ही है लेखन कला की आधारशिला : श्रीपाद जोशी

देशोन्नती

# विद्यापीठातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग आणि विज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिवस गुरुवारी उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे अध्यक्षस्थानी होते तर वरिष्ठ क्रीडा पत्रकार नरेश शेळके, डॉ. सी. पी. चौधरी, के.जी पाटील यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती. पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. माधवी मार्डीकर यांनी खेळाचे महत्व तसेच प्रमुख अतिथींची ओळख करून दिली. वरिष्ठ क्रीडा पत्रकार नरेश शेळके यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर व खेळावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयी विविध प्रकारची माहिती दिली. त्याचप्रमाणे नुकत्याच झालेल्या ऑलिंपिकचे विश्लेषण केले. संचालन कुमारी सूची हिने केले तर आभार हर्षल ने मानले. बुद्धिबळ, टेबलटेनिस, एथलेटिक्सचे विविध प्रकार टग ऑफ वार असे विविध खेळ विद्यार्थ्यांसाठी आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वृषाली देशमुख,




लोकमत

# भाषाबोध हीच लेखनकलेची आधारशिला

## श्रीपाद जोशी : मीडिया लेखन कार्यशाळेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : भाषाबोध हीच लेखनकलेची आधारशिला असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक तथा अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर हिंदी विभागाच्यावतीने आयोजित दोन दिवसीय 'मीडिया लेखन कार्यशाळे'च्या समारोपीय कार्यक्रमात शनिवारी डॉ. जोशी मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून अखिल ...

EXCLUSIVE WEDDING COLLECTION
UP TO 50% OFF
श्री महालक्ष्मीजी के लिए फैन्सी जरी की साडियां
प्युअर येवला पैठणी
बनारसी शालू
कांजीवरम सिल्क
सॉफ्ट सिल्क, पटोला सिल्क
डिज़ाइनर साड़ी
प्युअर सिल्क ९ वार

LOKMAT TIMES

# NU fetes Justice Patel, Sonu Sood

LOKMAT NEWS NETWORK
NAGPUR

As part of the centenary celebrations of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, 100 distinguished former students who have made remarkable contributions in various fields were honored at the closing ceremony of the centenary event.

Due to unavoidable circumstances, retired Justice J.N. Patel, actor and social worker Sonu Sood, and veteran actor Shahbaz Khan could not attend the ceremony. Therefore, they were honored by Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University at their residences in Mumbai.

Retired Justice J.N. Patel expressed that an ideal society is built through noble thoughts and values. Life is a continuous stream, through which one learns to distinguish between good and bad. The foundation of good education fosters life values, he added. Sonu Sood and Shahbaz Khan expressed their pride in being former students of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University. They acknowledged that the cultural foundation they received at the university is what has shaped their current work in the cultural sector. During this informal discussion, Sonu Sood also presented his book, "Mai Maseeha Nahi" (I am Not a Messiah).

On behalf of Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Dr. Kalpana Pandey, Secretary of the Alumni Association, and Pramod Tijare, Cultural Program Coordinator for the centenary celebration, presented gifts to the honored guests. Senior film director Yash G. Chavan, actor Parag Bhavsar, and Dr. Manisha Yamsanwar, a member of the Alumni Association, were also present on this occasion.


Bollywood actor and RTMNU alumni Sonu Sood presenting his memoir to the university officials.

Nagpur First
Page No. 6 Sep 01, 2024
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# 'भारतीय ज्ञान परंपरा आणि साहित्य दृष्टी'वर राष्ट्रीय चर्चासत्र

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**विद्यापीठ हिंदी विभागात १२ व १३ सप्टेंबरला आयोजन**

नागपूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व शिक्षण, संस्कृती उत्थान न्यास नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागात 'भारतीय ज्ञानपरंपरा आणि साहित्यदृष्टी' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र १२ व १३ सप्टेंबर रोजी होणार आहे.

प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. संजय दुधे, डॉ. राजू हिवसे, डॉ. श्यामराव कोरेटी व शोभा पैठणकर यांच्या मार्गदर्शनात चर्चासत्र होईल. चर्चासत्रात विविध विषयांवर चर्चा केली जाणार आहे. चर्चासत्रात न्यासचे राष्ट्रीय सचिव डॉ. अतुल कोठारी, विचारवंत रामेश्वर मिश्र पंकज, पंजाब विद्यापीठ चंदीगडचे माजी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुधीर कुमार, माजी पोलीस महानिरीक्षक डॉ. भूषणकुमार उपाध्याय, एसएनडीटी मुंबई येथील डॉ. जितेंद्र तिवारी, डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ सागर येथील तत्त्वज्ञान विभागप्रमुख प्रा. अंबिका दत्त शर्मा, बिकानेर येथील विचारवंत डॉ. नंदकिशोर आचार्य, बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी येथील इतिहास विभागाचे माजी प्राध्यापक सीताराम दुबे, मध्यप्रदेश शासनातील भोपाळ येथील माजी अपर मुख्य सचिव मनोज श्रीवास्तव, विचारवंत डॉ. आनंदकुमार सिंह, नवी दिल्ली येथील प्रधानमंत्री संग्रहालयातील फेलो डॉ. ज्योतिष जोशी, खंडोबा येथील विचारवंत डॉ. श्रीराम परिहार, डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ, दिल्ली येथील प्रा. सत्यकेतू उपस्थित राहतील. चर्चासत्राचे संयोजक डॉ. मनोज पांडे, तर आयोजन सचिव म्हणून डॉ. संतोष गिऱ्हे व्यवस्था पाहत आहेत. आयोजन समितीमध्ये डॉ. लखेश्वर चंद्रवंशी, डॉ. सुमीत सिंह, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. जागृती सिंह व प्रा. दामोदर द्विवेदी कार्य पाहत आहेत.

Nagpur Edition Edition
Sep 02, 2024 Page No. 08
Powered by: erelego.com

"Times of India" DATE 2/9/2024 PAGE No. : 4

# Two Nagpur University departments hold events to improve students' writing skills

Nagpur Universty's department of zoology organised a guest lecture on 'How to write an article' by **Shalini Lihitkar,** professor, department of library, and information science, **NU.** The insightful lecture was held at post graduate teaching department of zoology, NU. **Prof VT Dhurvey,** HoD, introduced the guest speaker, while **Prof SC Masram,** felicitated the guest.

The session was aimed at guiding students and faculty on the intricacies of writing a compelling and **well-structured article.** Lihitkar emphasized the importance of having a clear purpose for writing an article. **Lihitkar's lecture** provided valuable insights into the process of writing an effective article.

Her emphasis on **structure,** clarity, and **thoroughness** offered attendees practical advice to enhance their **writing skills** by using effective tools **like Zotero,** an open-source reference management software and plagiarism **checker X.**

Attendees appreciated Lihitkar's expertise and the **comprehensive nature** of the presentation and discussed few questions. **Harshada Pawar** proposed a vote of thanks.

Meanwhile, a two-day media **writing workshop** was organised by the Hindi department of NU. Dean faculty of humanities **Shamrao Koreti,** emphasised the importance of writing skills in today's era of skill development. He noted that **writing skills** are crucial in **all fields of life** and contribute significantly to overall personality development.

**SP Singh,** OSD at Visvesvaraya National Institute of Technology, highlighted the media's **vital role** in bringing truth to light in society. **Manoj Pandey,** head of Hindi department, presided over.

Renowned journalists and experts conducted the workshop, providing **valuable insights** into news writing and letter writing. A total of **76 students** from various colleges and departments participated in the workshop.

The workshop was conducted by **Lakheswar Chandravanshi,** while vote of thanks was proposed by Ekadashi Jaitwar. **(Reporting by Devyani Naukarkar)**




# भाषाबोध हेच लेखनकलेची आधारशिला

## डॉ. श्रीपाद जोशी यांचे प्रतिपादन

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : भाषाबोध हेच लेखनकलेची आधारशिला असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर हिंदी विभागात दोन दिवसीय 'मीडिया लेखन कार्यशाळे'च्या समारोपीय कार्यक्रमात डॉ. जोशी मार्गदर्शन करीत होते. यावेळी हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे, निरज श्रीवास्तव, चारुदत्त कहू आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. जोशी यांनी प्रसार माध्यमातील लेखनासाठी समाज, संस्कृती आणि भाषेचा गहन बोध असावा लागतो, असे सांगितले.

